शनिवार
१० मे १९८०
७५ पैसे

# माणूस

## शंभरेक भाषणे, चाळीस मानपत्रे, ५० वर्षांपूर्वी

संपादक ' माणूस '

मागील ३ मेच्या अंकातील ' पूर्वांचलाचे आव्हान ' या नव्या लेखमालेच्या प्रास्ताविकातील, एप्रिल १९४७ मध्ये आसामचे तात्कालिन मुख्यमंत्री गोपीनाथ बार्डोलाय यांना सावरकरांनी पाठवलेल्या तारेचा उल्लेख समयोचित आहे. तत्पूर्वीही सावरकरांनी आसामकडे भारतीयांचे लक्ष वेधले होते. आसाममधील लोक ख्रिश्चन होऊ नयेत यासाठी हिंदू नेत्यांनी, धर्माचार्यांनी सावध रहावे, तेथे जाऊन हिंदुधर्माचा प्रचार करावा, असे आवाहन करणारे दोन लेख सावरकरांनी सन १९३१ च्या ऑगस्ट महिन्यात लिहिले आहेत. त्या वेळी, म्हणजे जवळजवळ ५० वर्षांपूर्वी सावरकर रत्नागिरी येथे स्थानबद्ध होते. ह्या स्थानबद्धतेच्या काळात त्यांनी सिंध मुंबईपासून वेगळा करू नका यासाठीही लेख लिहिले; पण ते जसे दुर्लक्षिले गेले तसेच आसामसंबंधीही झाले. आसामसंबंधीचे हे दोन्ही लेख–' नागलोकांची सद्यःस्थिती ' आणि 'नागलोक ख्रिश्चन का होतात ?' आता समग्र सावरकर वाङ्मय खण्ड ३ मध्ये प्रसिद्ध झालेले आहेत. या लेखात सावरकरांनी शंकराचार्यांना विनंती केली आहे की, त्यांनी चातुर्मासात केवळ शंकराच्या पिंड्या करीत बसू नये, सारा वेळ न्यायालयात भांडणे करण्यात न घालविता त्यांनी ह्या आसाममधील नागलोकांकडे लक्ष द्यावे आणि त्यांना ख्रिश्चन होण्यापासून परावृत्त करावे ! १९२८ मध्ये गोव्यात श्री. मसूरकरमहाराजांनी तर हजारो ख्रिश्चनांनाच हिंदू करून घेतले होते. योगायोग असा की, १९२६ च्या डिसेंबर महिन्यात एका सत्यनारायणपूजेच्या समयी भाषण देताना सावरकर म्हणाले, ' रत्नागिरी नगरात पूर्वास्पृश्यास अहिंदु येतो तोपर्यंत तरी येऊ देणारे ५० घरधनी निघतील आणि गोमांतक वसईकडे तीन–चार वर्षांत ३ सहस्र लोक शुद्ध होतील तर हे सत्यनारायणा, तुझा एक सत्यनारायण आम्ही रत्नागिरीकर करू !'

सावरकर १९३७ मध्ये रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून मुक्त झाले आणि हिंदुमहासभेचे अध्यक्ष म्हणून ते प्रांतोप्रांती पत्रव्यवहार आणि दौरे करू लागले. नोव्हेंबर १९४१ मध्ये त्यांनी आसामचा दौरा केला. या दौऱ्याचे प्रतिवृत्त देणारे तीन लेख दि. ९, १२ नि १६ डिसेंबर १९४१ च्या केसरीच्या अंकांतून प्रसिद्ध झालेले आहेत.

त्या वेळी आसामात सादुल्लाखान यांचे पाकिस्तानी प्रवृत्तीचे मंत्रिमंडळ अधिकारावर होते. त्यामुळे दौऱ्याचे प्रारंभीच तेथील कार्यकर्त्यांना आणि सावरकरांना पत्रे पाठवून धमक्या देण्यात येत होत्या की, आसाममधून सावरकरांचे प्रेतच बाहेर पडेल !

ह्या धमक्यांसंबंधी योग्य ती दक्षता घेऊन सावरकरांनी तेथील भागाचा दौरा केला. त्या दौऱ्यात त्यांनी शंभरएक भाषणे केली. त्यांना ४० मानपत्रे मिळाली. या भाषणांतून त्यांनी आसामचा जुना इतिहास सांगून हिंदूंमध्ये नवचैतन्य निर्माण केले. आसामातील ओसाड भूमीवर मुसलमानांची वसाहत केली जात आहे आणि ह्या योगे त्यांची वस्ती वाढल्यास हा प्रदेश पाकिस्तानला जोडला जाईल अशी भीती सावकरांनी व्यक्त केली ! ही भीती पं. नेहरूंना सांगितली गेली असता नेहरूंनी उत्तर दिले होते की, निसर्गाला पोकळी मान्य नसते ! नेहरूंच्या ह्या विधानातील ' तत्त्वज्ञानाला ' उत्तर देताना सावरकर म्हणाले की, नेहरू हे तत्त्वज्ञ वा शास्त्रज्ञ नाहीत ! त्यामुळे त्यांनी हे ध्यानात घेतले नाही की अशी पोकळी विषारी वायूने भरू नये यासाठी दक्षता घ्यावी लागते !

या दौऱ्यात सावरकरांचे नागालोकांनी ' हिंदुओंका राजा आया ' असे म्हणून स्वागत केले होते.

सावरकरांच्या ह्या दौऱ्याचा प्रभाव सांगताना अमृतबझारपत्रिकेने लिहिले होते, ' सावरकरांच्या ह्या भाषणामुळे आसाममधील हिंदूंना, मग ते काँग्रेसी असोत वा काँग्रेसेतर असोत, हिंदुसंघटनेचे महत्त्व पटू लागले आहे. '

प्रेषक : बाळाराव सावरकर, मुंबई.

**–हे जर खरे असते, हिंदूसंघटनेचे महत्त्व तेव्हा खरोखरच आसामी जनतेला पटले असते तर ' पूर्वांचलाचे आव्हान ' आज उभे ठाकले असते का ?**

लेखमाला पृष्ठ.... ११

मुंबई–वार्ता । किरण जोग

# मुलुंडला 'भाजप' पुढे

उमेदवारांच्या अर्ज भरण्याबरोबरच मुंबई-तील निवडणुकीचा पहिला टप्पा आता पूर्ण झाला आहे. अजून वातावरण तापायला वेळ लागेल; परंतु उमेदवारांचे आपापल्या मतदारक्षेत्रातील प्राथमिक दौरे चालू झालेले दिसतात. मुलुंडचे विधानसभा-मतदारक्षेत्रही याला अपवाद नाही.

मुलुंड मतदारसंघ हा गुजराथी समाजाची बरीच वस्ती असलेला असा मतदारसंघ आहे. मराठी वस्तीही आहे; परंतु एखाद्या उमेदवाराला गुजराथी समाजाची मते मिळाल्याशिवाय तो निवडून येणे सर्वथा अशक्य आहे. पूर्वीपासूनच या मतदारसंघात सुशिक्षित मतदारांचे प्राबल्य आहे. झोपडपट्टीचा काही भाग सोडल्यास पांढरपेशा नोकरीसाठी मुंबईत जाणारा मध्यमवर्गीय मराठी माणूस व व्यापारधंद्यात गुंतलेला गुजराथी समाज, असा हा संमिश्र मतदारसंघ आहे. तसेच तामीळ बांधवांची संख्याही लक्षणीय अशीच आहे. येथील खासदार श्री सुब्रह्मण्यमस्वामी हेही तामिळीच !

या विधानसभा मतदारसंघात मुंबई महापालिकेचे ४ वॉर्ड येतात. ते वॉर्ड म्हणजे वॉर्ड क्रमांक १३५, १३८, १३९ व १४०. जर या वॉर्डांप्रमाणे या मतदारसंघाचा विचार करायचा झाला तर येथे पूर्वीच्या भारतीय जनसंघाचे म्हणजेच 'भाजप'चे प्रभुत्व निश्चितपणे जाणवते. या चार वॉर्डांपैकी ३ ठिकाणी महापालिकेतील पुरोगामी लोकशाही गटाचे नगरसेवक आहेत. वॉर्ड क्रमांक १३८ मध्ये श्री. रामचारी हे नगरसेवक असून ते अर्स काँग्रेसचे आहेत. तर वॉर्ड क्रमांक १३९ व १४० मध्ये अनुक्रमे श्री. जगजीवन तन्ना व श्री. बाळासाहेब धारप (अध्यक्ष स्थायी समिती) हे नगरसेवक असून ते गेली कैक वर्षे जनसंघाचे आहेत; परंतु वॉर्ड क्रमांक १३५ मध्ये शिवसेनेचा जोर आहे.

वॉर्ड क्रमांक १३५ मध्ये शिवसेनेचे नगरसेवक श्री. बाबूराव पाटील हे आहेत. यंदा शिवसेनेने काँग्रेस (इं) ला पाठिंबा दिला आहे ही गोष्ट या मतदारसंघात महत्त्वाची ठरेल.

गेली काही वर्षे येथे तिकिट देण्यावरून असंतोष आहे. कारण मुलुंड विधानसभा क्षेत्रात सतत 'जनता'ने व आता 'भारतीय जनता'ने मुलुंडच्या बाहेरील उमेदवाराला 'लादले' आहे असा कार्यकर्त्यांचा आरोप आहे. व त्यात तथ्यही आहे. १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत श्री. बाळासाहेब धारप यांना तिकिट मिळावे असा कार्यकर्त्यांचा आग्रह होता; परंतु त्यांच्या जागी श्री. प्रभाकरपंत पटवर्धन यांना तिकिट देण्यास आले. अर्थात पक्षशिस्तीबद्दल प्रसिद्ध असलेल्या जनसंघाच्या श्री. धारप यांनी 'बंडखोरी' केली नाही.

यंदाही श्री. वामनराव परब यांना 'भाजप'ने उमेदवार म्हणून निवडले आहे; पण तेही बाहेरचे म्हणजे कामाठीपुऱ्याचे आहेत; परंतु गंमत म्हणजे काँग्रेस (इं) नेही आयत्या वेळी श्री. त्रिवेदी या स्थानिक उमेदवाराऐवजी कु. छाया आजगावकर या जोगेश्वरीच्या कार्यकर्तीस तिकिट देऊन 'भूमिपुत्रावर' अन्यायच केल्याने दोन्ही पक्षांना आता 'स्थानिक' उमेदवारांच्यासाठी भांडायचा अधिकार नाही. जनता पक्षाचे उमेदवार श्री. के. पी. शाह हे मात्र स्थानिक आहेत. पूर्वीचे ते संघटना काँग्रेसचे; परंतु ते अनामत रक्कम वाचवू शकले तरी खूप झाले !

येथील खासदार श्री. स्वामी हे शहा यांचा प्रचार करतील; परंतु स्वतः श्री. स्वामी यांना अटीतटीच्या झुंजीत मुलुंडमुळे विजय मिळाला होता व १८ हजारांवर आघाडी मुलुंड विधानसभा मतदारसंघानेच दिली होती हे विसरता येणार नाही. त्यांच्या विजयास संघस्वयंसेवकाचे अथक परिश्रमच कारणीभूत होते. अशा वेळी स्वामींचा प्रभाव किती पडेल ही शंकाच आहे.

श्री. वामनराव परब यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेऊन या मतदारसंघात प्रचाराला सुरुवात केली आहे ५-१० हजार मतदारांवर ज्यांचा प्रभाव आहे. अशा प्रमुख कार्यकर्त्यांना सध्या ते भेटत आहेत. यानंतर कार्यकर्त्यांचा मेळावा होऊन प्रचाराला सुरुवात होईल असे दिसते.

काँग्रेस (इं) गोटात तिकिटावरूनच घोळ होता. तिकिट न मिळालेल्या श्री. त्रिवेदी यांनी बंडखोर म्हणून अर्ज भरला असून कार्यकर्त्यात कु. छाया आजगावकर यांच्या उमेदवारीबद्दल तीव्र नापसंती व्यक्त होते. एकंदर पाहता फार काही स्थित्यंतरे घडली नाहीत तर वामनराव परबांना निवडून येणे जड जाऊ नये. अर्थात घोडामैदान जवळच आहे ! □


साप्ताहिक माणूस

वर्ष : एकोणिसावे

अंक : पन्नासावा

१० मे १९८०

किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी ।
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# उन्हाळा की वसंतऋतु

पुण्यात उन्हाळा का वाढला आहे यावर विचार करीत आजची संध्याकाळ घालविण्याचे मी ठरवले. पुण्यात उन्हाळा वाढण्याची कारणे पुष्कळ लोक पुष्कळ सांगत असतात. कुणी म्हणतात, वृक्षतोडीमुळे उन्हाळा वाढला. कुणी म्हणतात, सिमेंट-काँक्रीटचे जे ठोकळे उभे आहेत (ज्यांना लोक घरे म्हणतात) त्यामुळे शहरातील उष्णता वाढली. कुणाचे म्हणणे डांबराच्या रस्त्यांमुळे तपमान चढले आहे. कुणी, माणसांची जी अतिशय दाटी झाली आहे ती वाढत्या तपमानाचे कारण धरतात !

जर मार्क मिळविण्यासाठी निबंध लिहावयाचा असला तर ही कारणे अगदीबरोबर आहेत. या निबंधाला घो घो मार्क पडतील ! वृक्षतोडीमुळे उन्हाळा वाढतो यात संशय नाही. आज पुण्यासारख्या शहरांतून असे वाटते की, नागरिक झाडे लावीत असतात आणि वीजवाले किंवा टेलिफोनवाले ती तोडीत असतात. दोघांच्या या स्पर्धेत कोण जिंकतं बघावयाचं ! वृक्षतोडीसारखाच डांबरी रस्ता तपमान वाढवतो हे खरे; पण एकच रस्ता तीन चार वेळा लागोपाठ दुरुस्त होत असल्याने तपमान फार चढते. म्हणजे असे की, खड्डे पडलेला रस्ता कार्पोरेशन डांबर–खडी पसरून नीट करते तोच, आधी संकेत ठरलेला असावा तसे नळवाले, ड्रेनेजवाले, टेलिफोनवाले, वीजवाले 'काम चालू रस्ता बंद' अशा काठीला लावलेल्या पाट्या उंच धरून, दुसऱ्या हातात धोक्याची तांबडी निशाणे घेऊन, कुदळ, फावडी, घमेली वगैरे खणण्याची आपली हत्यारे घेऊन व्यूह उभे राहतात ! रस्ता दुरुस्त करून रोलर क्षितिजाखाली जाताच एकजण पुढे होऊन दुरुस्त रस्ता खणू लागतो. त्याचे काम झाले की पुन्हा डांबराची गाडी येते, लहान रोलर येतो व खणलेला रस्ता दुरुस्त केला जातो. तोच व्यूत उभे असलेल्यांपैकी एकजण कुदळ हाणून खणणे सुरू करतो !

हे चक्र सतत चालू असते अशी नागरिकांची समजूत आहे; पण ती खरी नाही. तरी पुन्हा पुन्हा रस्ता नीट करण्यास डांबराची भट्टी पेटते, तापलेले डांबर रस्त्यावर पसरले जाते याचा परिणाम तपमान वाढण्यात होतो यात शंका नाही. याशिवाय, उखडलेले रस्ते व फुटपाथ ओलांडताना नागरिकांचा जो संताप होतो त्यानेही उष्णता वाढण्यास मदत होते !

पुण्यातील तपमान वाढण्याची ही सर्व संभाव्य कारणे आहेत. पुण्यातील उन्हाळा वाढण्याचे खरे कारण अगदी वेगळे आहे. उन्हाळ्यास आरंभ झाला की पुण्याचे नागरिक म्हणू लागतात 'या वर्षी उन्हाळा जास्त आहे !' या त्यांच्या उन्हाळा जास्त आहे म्हणण्यानेच पुण्यातला उन्हाळा वाढतो आहे. उन्हाळा वाढण्याचे हे खरे कारण आहे. उगाच वृक्षतोडीला, कार्पोरेशनला, काँक्रिट इमारतींना आणि टेलिफोनवाल्यांना नावं ठेवण्यात काय अर्थ आहे ? मन जे चिंतीत असते ते होत असते, याचे ढळढळीत उदाहरणच द्यावयाचे झाले तर ज्या मुंबईत प्लॅस्टिकच्या बनवलेल्या पानाफुलांवाचून निसर्ग उरला नाही व माणसावाचून दुसरा कुणी प्राणी नाही, त्या मुंबईत ऋतुचक्र लिहिले जावे एवढेच नव्हे तर त्याला अॅकॅडमीचे बक्षीस मिळावे ! तेव्हा मनाने मनात आणले तर काय होत नाही ?

खरे म्हणजे आपण आज ज्याला उन्हाळा म्हणतो तो प्राचीन काळचा वसंतऋतू आहे. त्याला उन्हाळा हे नाव देऊन आपण अगदीच बदनाम केले आहे. चैत्र-वैशाख – वसंतऋतू, ज्येष्ठ-आषाढ – ग्रीष्मऋतू, श्रावण-भाद्रपद – वर्षाऋतू. हे ऋतूंचे सुंदर चक्र आपण महिन्यांना जानेवारी-फेब्रुवारी ही नावे देऊन थांबवले आहे. अर्थात ऋतू थांबत नाहीत; पण आपले त्यांच्याकडे लक्ष नसले की ते आपल्यापुरते थांबल्यासारखेच आहेत. ऋतु घडत असून कळत नाहीत. कोकिळा येते, व्यर्थ ओरडून जाते. मेघ येतात फुकट गडगटाट करून जातात. थंडी येते, उगीचच कडकड वाजून जाते !

वसंतऋतूकडे लक्ष असल्यामुळे प्राचीन वाङ्मयातून कवींनी व लेखकांनी वर्णने केली. वसंतऋतूत पूजेला निघालेल्या रमणीला कवी म्हणतो,

'वसंत तुझ्यात बसला आहे. वासन्ती व कुंदा यांच्या फुलात कुरबकाची फुले मिसळून त्या तिन्ही फुलांमिळून तुझा गजरा सजला आहे. वेणीत अशोक आहे. स्तनांवर सिंदुवार शोभलाय. नवीन आंब्याच्या नवीन मंजरींनी व हलणाऱ्या कोपलांनी तुझी कर्णफुले बनली आहेत. हे सुवदने ! ओंजळीत फुले भरून तू मूर्तिमान वसंतालाच वाहात आहेस !"

वसंतऋतूचे दुसरे एक वर्णन पहा, "फुलांचे खिदळण, मस्त भृंगे, कूजणारी कोकिळा, येणारा छान घाम, गोड हवा, कर्कश आणि प्रचंड काम यांनी भरलेला वसंत, कुमारिकेला हजारो दूत नेऊ शकणार नाहीत. असा प्रियकराकडे ओढून नेतो."

पृष्ठ २१ वर

बगाड ( १५ )

# नाळ कापल्यानंतर

बध्या

हल्ली दर दिवशी नवे राजकीय पक्ष जन्माला येत असल्याने या कामातील वाकबगार सुइणींनाही बरकत आली आहे. त्यांच्या धंद्याशी संबंधित शब्दप्रयोग वर्तमानपत्रांतून आणि लोकांच्या भाषणांतून बरेचदा कानांवर येत असतात. त्यांपैकी सध्या वापरात असलेला शब्दप्रयोग म्हणजे 'नाळ कापणे' हा होय. जनसंघासारख्या अनुभवी राजकीय पक्षाला रा. स्व. संघासारख्या मातृस्थानी असलेल्या संघटनेशी जोडलेली वैचारिक नाळ तोडता आली नाही किंवा तोडवली नाही हे आपण पाहिले आहे. संघाची आणि जनसंघाची विचारसरणी आपल्याला पटत नसली तरी त्यांच्यापुढे उभा राहिलेला प्रश्न बिकट होता हे मान्य केलेच पाहिजे.

परंतु मनुष्यजातीच्या इतिहासात 'नाळ कापण्या'चा एक असाच निकराचा प्रसंग गेल्या शे-दीडशे वर्षांत निर्माण झाला आणि त्याचे विदारक परिणाम नुकतेच मृत्यू पावलेले विख्यात साहित्यिक सार्त्र यांच्या वाङ्मयात दिसून येतात. त्याचा आढावा घेण्याचा हा प्रयत्न.

युरोपच्या इतिहासात जवळजवळ हजार वर्षे अशी गेली की, ईश्वरी कल्पनेचा आणि पारलौकिक विचारांचा गाढ पगडा युरोपीय समाजावर होता. आज युरोपीय समाज सर्वस्वी इहवादी किंबहुना भोगवादीदेखील बनला आहे, असे म्हणतात; पण चारपाचशे वर्षांपूर्वीपर्यंत या समाजावर पारलौकिक विचारांचे दुर्निवार्य वर्चस्व होते. ऐहिक जीवन हे पारलौकिक सुखाच्या प्राप्तीसाठी व्यतीत करावयाचे असते, युगान्ती ईश्वरापुढे आपल्याला पापपुण्याचा हिशेब द्यावा लागणार आहे, मनुष्यजन्माचे ध्येय ईश्वरप्राप्ती हे आहे इत्यादी विचार समाजात किती खोलवर रुजले होते याचे पुरावे आपल्याला त्या काळी बांधली गेलेली भव्य प्रार्थनामंदिरे, त्यात विख्यात चित्रकारांनी रंगवलेली ठसठशीत आणि प्रभावी धार्मिक चित्रे यावरून मिळतात. संगीत, नाट्य, शिल्प, वाङ्मय, सणसमारंभ वगैरे जीवनाची विविध अंगे पारलौकिक विचारांनी अशी ओतप्रोत भरून गेली होती की, पोवळ्यातून मध ठिबकावा तसे या सर्वांतून अध्यात्म ठिबकताना आढळते.

त्यानंतर आपल्याला माहीतच आहे की, पाश्चात्य समाजात इहवादी विचार हळूहळू बळ धरू लागले. प्रथम ख्रिश्चन धर्माच्या संघटनेला तडा गेला, नंतर ख्रिश्चन जगताचे ऐक्य मोडकळीला येऊन स्वतंत्र राष्ट्रे जन्माला आली; वैज्ञानिक शोध, वसाहतींकडून आलेला पैशाचा ओघ यामुळे ऐहिक जीवन सुखी बनत चालले आणि परलोकाची आस कमी होऊन इहलोकाकडे लोकांची दृष्टी वळू लागली. तथापि हे लक्षात ठेवले पाहिजे की, ईश्वरी तत्त्वाला यामुळे धक्का पोचला किंवा देवावरची निष्ठा संपली असा याचा अर्थ नाही. इहलोक हा परलोकासाठी साधन म्हणून वापरायचा आहे हा विचार मंदावत गेला इतकाच त्याचा अर्थ.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रथमार्धात हेगेल या तत्त्वज्ञाने असा विचार मांडला की, मनुष्य म्हणजे ईश्वराचा ईश्वरापासून दुरावलेला अंश आहे आणि त्यामुळे ईश्वर-प्राप्ती किंवा ईश्वराशी पुन्हा एकरूप होणे हे मनुष्यजीवनाचे सार आहे. त्यावर फ्यूअरबाख या तत्त्ववेत्त्याने म्हटले की, मनुष्य हा ईश्वरापासून दुरावलेला ईश्वरांश आहे हे म्हटल्याने काहीच साधत नाही; नुसते कल्पनारंजन मात्र होते. कारण ईश्वर ही एक केवळ कल्पनाच आहे. वास्तव जीवनात तिला काही आधार नाही. किंबहुना ईश्वरासारख्या काल्पनिक आदर्शाच्या मागे लागून मनुष्य स्वतःपासून मात्र दुरावतो. त्याऐवजी स्वतःच्या मनुष्यत्वाचा पूर्ण विकास हे मनुष्याने आपले ध्येय मानले पाहिजे. त्याने स्वतःशी प्रामाणिक राहिले पाहिजे.

## मनुष्यतेचा शोध

ही मनुष्यता काय आहे ? पिवळा कागद, झेंडूचे फूल, पिवळी भिंत ही पिवळेपणाची उदाहरणे आहेत असे आपण म्हणतो तेव्हा या उदाहरणांखेरीज पिवळेपणा म्हणून काही कल्पना आहे आणि तिची ही निरनिराळी मूर्त रूपे आहेत असा आपल्या म्हणण्याचा अर्थ असतो. तशी मनुष्यपणाची काही कल्पना आहे आणि प्रत्येक मनुष्यव्यक्ती ही त्या मनुष्यपणाचे प्रत्यक्षरूप आहे, असे आपण म्हणू शकू का ? जोपर्यंत मनुष्याची ईश्वरावर निखालस श्रद्धा होती तोपर्यंत देवापाशी मनुष्यत्वाची काही कल्पना असेल आणि त्या कल्पनेवरून त्याने आपणा सर्वांची निर्मिती केली असावी असे म्हणण्यास जागा होती; परंतु देवच नाही असे मानल्यावर मनुष्यत्वाची काही निश्चित कल्पना आहे हे म्हणणे सोडून द्यावे लागते.

याउलटही विचार आपण करू शकतो. अनेक पिवळे पदार्थ पाहून त्यांचा सामान्य गुणधर्म आपण बाजूला काढला आणि पिवळेपणा ही कल्पना निर्माण झाली. त्याचप्रमाणे सर्व माणसांतील सामान्य गुणधर्माला आपण मनुष्यत्व म्हणू शकू का ? तसेही शक्य नाही. कारण मनुष्यतेची जी व्याख्या निरीक्षणावरून आपण बनवू तिला बाधा आणण्यासाठी एखादी व्यक्ती हट्टाने त्या व्याख्येच्या विरुद्ध वागू शकेल. तेव्हा मनुष्यतेचा पर्याप्त आणि आवश्यक असा गुणधर्म माणसांचे निरीक्षण करून काढता येईल असे नाही.

मनुष्यतेची कल्पना अशा रीतीने बाजूला पडल्यावर उरतो तो केवळ एकाकी मनुष्य-जीव; पण मनुष्य-जीव हा इतर प्राण्यांपेक्षा निराळा आहे. कारण त्याच्या ठिकाणी विवेकही आहे. विवेकामुळे मनुष्याला कर्तृत्व लाभते म्हणजेच स्वतःवर आणि काही प्रमाणात स्वतःभोवतीच्या परिसरावर तो संस्कार

करू शकतो; पण हे संस्कार करताना त्या संस्कारांच्या बऱ्यावाईट परिणामांची जबाबदारी मात्र त्याला एकटचालाच उचलावी लागते. कारण, देव आणि मनुष्यता हे दोन्ही आदर्श संपल्यानंतर आपण कोणते संस्कार स्वीकारावे यासाठी काहीच मानदंड मनुष्याच्या विवेकाला मार्गदर्शन करण्यासाठी उरलेला नाही. त्याने केलेली निवड ही सर्वस्वी त्याची एकटचाची निवड आहे आणि त्यामुळे त्या संस्कारांच्या परिणामांची जबाबदारीही त्याची एकटचाचीच आहे.

## निवडीचे स्वातंत्र्य आणि जबाबदारी

मनुष्यतेची पूर्वनिर्मित अशी कोणतीच व्याख्या नसल्यामुळे मनुष्याने स्वतःवर कोणते संस्कार करावेत याचे पूर्ण स्वातंत्र्य त्याला आहे. किंबहुना स्वतःच्या वर्तनाविषयी तो एक प्रकारच्या पोकळीत आणि सर्वस्वी एकाकी वावरत असतो. त्यामुळे एखाद्या परिस्थितीत उपलब्ध असलेल्या सर्व पर्यायांतून तो आपला मार्ग निवडू शकतो. अर्थात् कोणताही मार्ग न निवडण्याचा पर्यायही त्याला उपलब्ध आहेच. अशा रीतीने प्रत्येक क्षणी स्वतःला घडविण्याचे अनिर्बंध स्वातंत्र्य त्याला आहे. !

यावर कोणी म्हणेल की, कमीत कमी जन्म कोणत्या आईचे पोटी घ्यायचा हे तर मनुष्य स्वतः ठरवू शकत नाही? म्हणजे तितक्यापुरते तरी त्याचे स्वातंत्र्य बाह्य परिस्थितीने सीमित केलेच की नाही? खेरीज मोठमोठ्या लढाया होतात, अस्मानी संकटे कोसळतात, राजकीय घडामोडी होतात, त्यांच्यावर मनुष्याचे काहीच नियंत्रण असत नाही. अशा वेळेस मनुष्याला स्वातंत्र्य ते कोठून उरले? त्यावर उत्तर असे की, परिस्थिती निर्माण करणे मनुष्याच्या हाती कदाचित् नसेल; पण तिचा स्वीकार करणे किंवा न करणे त्याच्या हाती आहे. किंबहुना परिस्थितीने घातलेल्या मर्यादा ह्या माणसाने परिस्थितीचा स्वीकार करण्याचा जो निर्णय घेतला त्याचा परिणाम म्हणून घडलेल्या आहेत. ती जबाबदारी पूर्वीच्या निर्णयातून निर्माण झालेली आहे. ती त्याने स्वीकारलीच पाहिजे. परिस्थिती स्वीकारायची नसेल तर आत्महत्येचा पर्याय माणसाला होताच!

यावरून हे दिसून येईल की, मनुष्याला असलेले अनिर्बंध स्वातंत्र्य हा दारुण शाप आहे! कारण हे स्वातंत्र्य त्याच्या एकाकीपणातून आणि त्याच्या भोवती असलेल्या पोकळीमुळे निर्माण झालेले आहे. निर्णयस्वातंत्र्यामुळे मनुष्यावर पडणारी जबाबदारी विराट आणि भयकारी आहे. आता या जबाबदारीचे विराट आणि भयकारी स्वरूप आपल्याला सामान्यपणे जाणवत नाही. कारण आपले बहुसंख्य निर्णय हे समाजाच्या पठडीने आपल्यासाठी आधीच घेतलेले असतात आणि त्या पठडीचा स्वीकार करण्याचा निर्णय आपण बहुधा अंधपणाने सुरुवातीपासूनच घेतलेला असतो.

परंतु ही परिस्थिती जेव्हा निकराची असते, निर्णय असे घ्यायचे असतात की, सामाजिक पठडीने ते आपणासाठी पूर्वीच घेतलेल्यांपैकी नसतात किंवा मनुष्य अधिक चिकित्सक किंवा हळवा असल्याने प्रत्येक निर्णयाच्या वेळी जबाबदारीची पूर्ण जाणीव ठेवणारा असतो, अशा परिस्थितीत निर्माण होणारे पेचप्रसंग बिकट असतात. सार्त्र यांनी आपल्या वाङ्मयात अशा पेचप्रसंगांचे अतिशय सूक्ष्म, तपशीलवार आणि साऱ्या बारकाव्यांचा कीस काढून वर्णन केले आहे. त्यातून दुसऱ्या महायुद्धानंतर उद्ध्वस्त झालेल्या पश्चिम युरोपमध्ये परिस्थिती अशा निकराला पोचलेलीही होती. त्यामुळे सार्त्र यांचे वाङ्मय अतिशय प्रभावशाली ठरले.

## समाज–मनस्कता

सार्त्र यांच्या विचारांचे जे स्थूल विवेचन इथवर केले त्यावरून अशी समजूत होईल की, या विचारात मनुष्याचे एकाकीपण मध्यवर्ती असल्याने समाजाच्या घडणीचा, सामाजिक निष्ठांचा आणि व्यक्ती व समाज यांच्यातल्या संबंधाचा विचार या तत्त्वज्ञानाला अभिप्रेत नाही. ही समजूत बऱ्याचश्या प्रमाणात खरीही आहे. सार्त्र यांनी असे प्रमेय मांडले आहे की,[1] मनुष्यजात एकजीव व्हायची असेल तर ती फक्त मनुष्यबाह्य शक्तीच्या उपस्थितीतच होऊ शकेल. त्यांनी एकदा असेही म्हटले आहे की, प्रत्येक मनुष्याच्या दृष्टीने दुसरी माणसे निरुपयोगी आहेत. दोन मनुष्यांतील प्रेम हा मूलतःच व्याघात आहे. कारण प्रेमाचा शेवट दोन व्यक्ती एकजीव होण्यात झाला पाहिजे आणि दोन व्यक्ती एकजीव झाल्या की, त्यांच्यात प्रेम कोठून येणार?

असे जरी असले तरी सार्त्र यांच्या विचारसरणीने इतर व्यक्तींचे आणि समाजाचे अस्तित्व नाकारलेले नाही. तसे शक्यही नाही. व्यक्ती दर क्षणाला निर्णय घेते. हा निर्णय घेण्याविषयीचा विचार ती भाषेच्या द्वारेच करणार आणि भाषा ही सामाजिक वस्तू आहे. खाजगी किंवा व्यक्तिगत भाषा संभवतच नाही. त्याचप्रमाणे मनुष्य विशिष्ट परिस्थितीत एखादा निर्णय घेतो तेव्हा तो केवळ स्वतःवरच संस्कार करतो असे नाही तर मनुष्यजीवाच्या बाबतीतली आणखी एक शक्यता तो प्रत्यक्षात आणतो. या अर्थाने तो निर्णय मनुष्य जातीच्या बाबतीतलाही एक निर्णय ठरतो. एकाकी मनुष्यजीवाला इतर मनुष्यांच्या अस्तित्वाची दखल आणखीही एका कारणाने घ्यावी लागते. तो स्वतः दुसऱ्या कोणा माणसाच्या स्वतंत्र विश्वातील एक पदार्थ झालेला असण्याचीही शक्यता असते. आपण जेव्हा इतर माणसांच्या हालचाली तटस्थपणे निरखीत असू त्या वेळेस आपली ती हालचाल देखील दुसऱ्या एखाद्या माणसाच्या निरीक्षणाचा विषय झालेली असेल. तेव्हा सार्त्र यांच्या तत्त्वज्ञानात व्यक्तीच्या स्वतंत्र विश्वाखेरीज इतर गोष्टींचा विचार होत नसला तरी समाजाचे किंवा इतर व्यक्तींचे अस्तित्व त्यात नाकारलेले नाही.

आपल्याखेरीज इतर विश्वे आणि समाज अस्तित्वात आहेत असे म्हटल्यानंतर ज्या वास्तवात मनुष्याचा विवेक निर्णय घेतो त्याचा ते भाग आहेत हे ओघाने आलेच. म्हणजेच मनुष्याला समाजासंबंधी निर्णय घ्यावेच लागणार. हे निर्णय प्रत्येक मनुष्य स्वतंत्रपणे घेईल किंवा तो एखाद्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा स्वीकारही करू शकेल. सार्त्र यांना मार्क्सवादात अभिप्रेत असलेले सामाजिक तत्त्वज्ञान पूर्णपणे मान्य होते. आजच्या युगाला शोभेल असे एकमेव मूलभूत क्रांतिकारी तत्त्वज्ञान फक्त मार्क्सवादातच आढळते असा त्यांचा स्पष्ट अभिप्राय होता.

## मार्क्सवाद आणि सार्त्र

मनुष्य प्रत्येक क्षणाला स्वतंत्र निर्णय घेऊन स्वतःला घडवीत असतो हे सार्त्र यांचे

व्यक्तिगत तत्त्वज्ञान होते. याउलट मार्क्सवादात पूर्वकल्पिताला अनन्यसाधारण महत्त्व आहे समाजवादी समाजरचना अटळ आहे. कामगारवर्ग आणि भांडवलदारवर्ग यांच्यातील संघर्ष अटळ आहे. कामगार किंवा भांडवलदार म्हटला की, तो अमुक एका रीतीनेच वागणार असे मार्क्सवादाचे ठाम सिद्धान्त आहेत. मनुष्याच्या कर्तृत्वाला आणि स्वतंत्र मूल्यनिरपेक्ष निर्णयाला तेथे अवसर नाही. अशा स्थितीत सार्त्र त्यांच्या व्यक्तिगत तत्त्वज्ञानानुसार सामाजिक बाबतीत कोणताही निर्णय घ्यायला ते स्वतंत्र असले तरी त्या तत्त्वज्ञानातील निर्णय–स्वातंत्र्याविरुद्ध सिद्धान्त मानणाऱ्या आणि पूर्वकल्पितावर श्रद्धा ठेवणाऱ्या मार्क्सवादाचा स्वीकार ते कसा करू शकतात ?

हा प्रश्न अवघड आहे. निर्णय–स्वातंत्र्यवादी तत्त्वज्ञान आणि मार्क्सवादी यांची सांगड घालण्याचा प्रयत्न सार्त्र यांनी 'क्रिटिक ऑफ डायालेक्टिकल रीझन' नावाच्या ग्रंथात केला; परंतु तो प्रयत्न पुरेसा यशस्वी झाला नाही असा काही तत्त्ववेत्त्यांचा अभिप्राय आहे. तथापी या प्रयत्नाची ढोबळ दिशा सांगता येईल. ती अशी–

सार्त्र यांच्या तत्त्वज्ञानाची मनुष्य–प्राणी आणि मनुष्याचा विवेक यांच्यातील संबंधाचे विश्लेषण ही एक बाजू आहे. दुसरी बाजू निर्णय–स्वातंत्र्य आणि मनुष्याची आत्मनिष्ठा म्हणजेच स्वतःच्या निर्णयाची जबाबदारी घेण्याची तयारी ही दुसरी बाजू आहे. अशा तत्त्वज्ञानाच्या पार्श्वभूमीवर समाजरचनेचा विचार करून सार्त्र अशा निर्णयाला आले की, सामाजिक क्रांती ही आवश्यक आहे. हा निर्णय घेतल्यानंतर आत्मनिष्ठ माणसावर ही जबाबदारी येते की, त्याने क्रांतीच्या दिशेने प्रयत्न केले पाहिजेत. आता सामाजिक क्रांती घडवून आणायची असेल तर सध्या प्रत्यक्षात असलेल्या सामाजिक परिस्थितीचे सर्वांगीण आकलन घडविणारी आणि नव्या समाजरचनेचे स्वप्न रंगविणारी विचारसरणी हवी. ही विचारसरणी आत्मनिष्ठ मनुष्य स्वतः निर्माण करू शकेल किंवा अस्तित्वात असलेल्या एखाद्या सर्वंकश विचारसरणीचा स्वीकारही तो करू शकेल. यात आत्मनिष्ठ तत्त्वज्ञानाशी विसंगत असे काही नाही. म्हणून मार्क्सवादाचा स्वीकार सार्त्र करू शकतात.

मार्क्सवादाचा स्वीकार करावयाचा म्हणजे मार्क्सवादातील पूर्वकल्पितही स्वीकारलेच पाहिजे असे नाही. मार्क्सवादात मनुष्यकर्तृत्वाला वाव नाही असेही नाही. जर समाजवादी क्रांती घडणे अपरिहार्यच असेल तर तिचा प्रचार कशाला करावला हवा? आणि साम्यवादी पक्षाच्या रूपाने क्रांतीचे हत्यार तरी कशाला पाजळावयाला हवे ? मार्क्सवादातील पूर्वकल्पिताची साम्यवादी पक्षाने आपमतलबाने अतिशयोक्ती चालविली आहे. त्यामुळेच सार्त्र मार्क्सवादी असले तरी साम्यवादी कर्मकांडात ते सहभागी झाले नाहीत. ते साम्यवादी पक्षाचे सभासदही नव्हते किंवा रशियाची निर्भर्त्सना करण्यासही त्यांनी आढेवेढे घेतले नाहीत. हंगेरी आणि झेकोस्लोव्हाकिया या दोन देशांबाबत रशियाने उचललेल्या साम्राज्यवादी पावलांचा धिक्कार सार्त्र यांनी केला होता.

चालू समाजरचनेचा समर्पक आढावा घेऊन त्यात क्रांतिकारी बदल घडवून आणण्याचे आश्वासन देणारी मार्क्सवाद ही एकमेव विचारसरणी आहे. दुर्दैवाने त्या विचारसरणीचे कर्मकांड बनवून काही आपमतलबी लोकांनी स्वतःच्या हितसंबंधाच्या रक्षणाचे हत्यार म्हणून तिचा वापर करण्यास सुरुवात केली आहे. अशा रीतीने स्वार्थाच्या चिखलात रुतून बसलेल्या या क्रांतीच्या रथाला उचलून ज्या मानवतावादी मार्गावरून धावण्यासाठी मुळात तो निघाला होता त्या मार्गावर आणून ठेवले पाहिजे. मनुष्यकर्तृत्व आणि मनुष्याचे निर्णयस्वातंत्र्य या गोष्टींना मूलभूत मानणारे आपले तत्त्वज्ञान हे कार्य करू शकेल असा सार्त्र यांचा विश्वास होता. □


**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**

**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**

**या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....**

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

**लेखक : वि. ग. कानिटकर**

**आवृत्ती : तिसरी (सचित्र)**

**किंमत : रुपये पंचेचाळीस**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

'माणूस' १६ फेब्रुआरी १९८० अंकात मध्यप्रदेशातील चांपा येथे रा. स्व. संघाच्या कार्यकर्त्यांनी गेली अनेक वर्षे चालवलेल्या कुष्ठनिवारणकार्यासंबंधीचे एक आवाहन प्रसिद्ध झाले होते. त्या आवाहनानुसार काहींनी आश्रमासाठी थोडेफार साहाय्यही पाठवल्याचे कळते. हे कार्य व त्यामागील प्रेरणा यांची थोडी अधिक ओळख करून देणारा हा लेख–

# मातृभूमीच्या गौरवार्थ....एक स्वयंसेवक

गो. रा. माटे, सातारा

गेल्या दीड–दोन वर्षांत पुष्कळ राजकीय पुढाऱ्यांनी व त्यांच्या अनुयायांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर चिखलफेक करून त्या संस्थेची निंदा करण्याची हौस पुरी करून घेतली. कोणी म्हणाले, संघ वर्णाश्रमवादी असून तो अस्पृश्यांच्या विरुद्ध आहे. कोणी म्हणाले, तो मुसलमान व ख्रिश्चन ह्यांच्या विरुद्ध आहे. त्यामुळे ह्या समाजांना त्यांची भीती वाटून ते हिंदु समाजापासून व राष्ट्रीय राजकारणापासून दूर दूर जात आहेत वगैरे वगैरे. असल्या आक्षेपांना संघाच्या निरनिराळ्या पुढाऱ्यांनी निरनिराळ्या प्रसंगी, निरनिराळ्या स्थळी उत्तरे दिलीच आहेत; पण ज्यांची दृष्टीच विकृत झाली आहे त्यांचे कोण समाधान करणार ? संघ आज केवढी कामगिरी करीत आहे, निःस्वार्थीपणाने त्याचे असंख्य स्वयंसेवक जीनवाची तमा न करता, आपली रोजची व्यवहारांतील कामे बाजूला सारून, रात्रंदिवस गरिबांची सेवा करण्यास कसे धडपडत आहेत ह्याची हकीगत ह्या लोकांच्या कानात शिरतच नाही त्याला कोण काय करणार ? आंध्र प्रांताच्या वादळात कुजलेली, दुर्गंधीयुक्त अशी प्रेते उचलण्यास दुसऱ्या कोणत्याही राजकीय पक्षाचे अनुयायी आले नाहीत ! ती उचलून त्यांची व्यवस्था संघाच्याच स्वयंसेवकांनी केली ! तेथे व गुजराथेत स्वयंसेवकांनीच पक्की घरे बांधून दिली. आज संघाचे प्रौढ शिक्षणाचे अक्षरशः हजारावर वर्ग चालू आहेत. त्यांना शासनाकडून एक पैचीही मदत मिळत नाही. त्यांना ठाऊक आहे की, शासनाजवळ ह्या कार्याकरता कोटचवधी रुपये आहेत; पण आपणाला त्यातली एक पैही मिळणार नाही. स्वयंसेवक स्वाभिमानी आहेत. शासकीय मदतीवाचून ते असे वर्ग चालवीत आहेत. एवढे वर्ग चालवणारी आणि तेही शासकीय मदतीवाचून दुसरी एकही संस्था नसावी. अशा तऱ्हेची सेवा निरपेक्ष बुद्धीने करताना, संघाच्या स्वयंसेवकांनी, अस्पृश्यांना, मुसलमानांना, ख्रिश्चनांना खड्यासारखे बाजूला काढल्याची बातमी कोठे ऐकू आली नाही; पण हे कोण लक्षात घेतो ?

ह्याच्याही पुढे जाऊन संघाचे स्वयंसेवक कुष्ठरोग्यांच्या सेवेतही कसे पुढे येत आहेत ह्याची एका ठिकाणची हकीगत खाली देत आहे.

आज झोपडपट्ट्यांचा प्रश्न सगळीकडे गाजत आहे; पण झोपडपट्टीतील लोकांपेक्षाही जास्त दुर्बल, असहाय, दुर्दैवी, दुःखग्रस्त कोणी असतील तर ते कुष्ठरोगी होत ! त्यांच्या मानाने झोपडपट्टीतील लोक भाग्यवान म्हटले पाहिजेत ! कारण त्यांना आपल्यावर प्रेम करणाऱ्या आपल्या बायकांमुलांसह तरी राहता येते, त्यांना राहायला गावात जागा मिळत आहे, थोडा का होईना ते कामधंदा, मोलमजुरी करून, अर्धे का होईना पोट भरू शकतात; त्यांची शरीरे तरी निरोगी आहेत. त्यांना इतर लोक जवळ तरी येऊ देतात; पण कुष्ठरोग्यांचे काय ? प्रेम करणारी बायका–मुले, आईबाप त्यांच्यापासून ताटातूट, गावापासून दूर निर्जन ठिकाणी गंजलेल्या, मोडक्यातोडक्या, जुन्यापान्या पत्र्यांची घरे, कामधंदा, नोकरी, मजुरीचा तर प्रश्नच नाही. सदैव भिक्षा मागणे, प्रेमाचा, सहानुभूतीचा एक शब्दही बोलणारे कोणी नाही, सदैव दूर, दूर, एकाकी राहण्याऱ्या कुष्ठरोग्यांची सेवा कोण करणार?' प्रत्येकाला ही भीती की त्यांच्यापासून आपल्याला हा रोग होईल की काय ? जो तो त्यांच्यापासून दूर पळतो. असे लोक आपल्या देशात काही थोडेथोडके नाहीत. तीस–चाळीस लक्ष तरी आहेत ! ह्यांची सेवा, त्यांच्यावर औषधोपचार प्रथम ख्रिस्ती धर्मप्रचारकांनी सुरू केला ! ह्यांच्याकडे कोणत्याही भारतीय पुढाऱ्याने लक्ष दिले नाही ! प्रथम लक्ष जर कोणी दिले असेल तर महात्माजींनी व विनोबाजींनी! आपल्या असंख्य कामातून वेळ काढून महात्माजींनी त्यांची सेवा स्वतः आरंभिली व राष्ट्राला व आपल्या अनुयायांना त्यांची सेवा करण्यास सांगितले. महात्माजींचे, विनोबाजींचे जे खरेखुरे कट्टर अनुयायी होते त्यांनीच त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन ह्या कार्यात हात घातला. दोघांनाही शेकडो, हजारो, लाखो खरे, सच्चे अनुयायी होते; पण तेसुद्धा हे काम करण्यास धजले नाहीत ! एवढ्या मोठ्या संख्येतून पुढे आले लोक सरासरी मूठभर ! मनोहरजी दिवाण, बाबा आमटे, डॉ. शिवाजीराव पटवर्धन ह्या लोकांनी आश्रम स्थापून, स्वतःचा जीव धोक्यात घालून कुष्ठांची सेवा करण्यास सुरुवात केली; पण त्यात संघाचे स्वयंसेवक कोणी नव्हते; पण तेही ह्या कामात कसे पडले ह्याचीच ही अद्भुत हकीगत आहे.

सदाशिव गोविंद कात्रे ह्या नावाचे एक महाराष्ट्रीय गृहस्थ उत्तर प्रदेशात रेल्वेखात्यात नोकरी करीत होते. त्यांचे वय ५०/५२ वर्षे झाल्यावर त्यांना कुष्ठरोग जडला. अर्थातच त्यांच्यावर हा मोठाच वज्राघात झाला! निम्मेअधिक आयुष्य उलटून गेलेले, शारीरिक शक्ती कमी होत चाललेली, अशा मनाच्या विषण्ण स्थितीत घरदार व आपली प्रेमळ कुटुंबीय माणसे सोडून, औषधोपचारासाठी उत्तर प्रदेश सोडून ते मध्यप्रदेशात बिलासपूर जिल्ह्यातील बैतलपूर येथील ख्रिश्चन धर्मप्रचारकांनी चालवलेल्या एका कुष्ठाश्रमात येऊन दाखल झाले. ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी त्या आश्रमात औषधोपचाराच्या निमित्ताने जी बाटवाबाटवी व इतर लीला चालविल्या होत्या त्या पाहून एक अमेरिकन दयाळू ख्रिश्चन डॉक्टर राजीनामा देऊन तेथून निघून गेला! हे पाहून तेथील रोग्यांनी संप, हरताळ सुरू केला व तो दोन महिने चालू होता. अखेरीस त्या वेळेचे मध्यप्रदेशचे राज्यपाल श्री. पाटसकर ह्यांना त्यात पडावे लागले. श्री. कात्रे ह्यांनी ह्या संपात उत्साहाने भाग घेतला होता व त्या धर्मप्रसारकांवर सडकून टीका केली होती. रोग्यांच्या असहकारामुळे एक चांगले भूतदयेचे कार्य बंद पडले होते. ते पुनः सुरू होऊन कुष्ठरुग्णांचे कल्याण व्हावे म्हणून श्री. पाटसकरांनी मध्यस्थी केली. त्या वेळी ते कात्रे ह्यांना उद्देशून म्हणाले होते, 'तुम्ही ह्या धर्मप्रसारकांवर टीका करीत आहात; पण अशी टीका करण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे? त्यांच्याप्रमाणे एक तरी हिंदी मनुष्य ह्यांची अशी सेवा करीत आहे काय? करून दाखवावे व मग टीका करावी!' कात्रे हे मोठे स्वाभिमानी गृहस्थ होते. त्यांना ही टीका फार लागली. त्यांनी तो आश्रम सोडला व तेथून ते महाराष्ट्र राज्यातील अमरावती येथील डॉ. शिवाजीराव पटवर्धनांच्या 'तपोवन' नावाच्या कुष्ठाश्रमात येऊन दाखल झाले. तेथे तीन–चार वर्षे औषधोपचार घेतल्यावर त्यांचा रोग बरा झाला खरा; पण पायाची दोन बोटे वाकडी झाली होती व पायाला एक व्रणासारखी जखम झाली होती व ती त्यांना जन्मभर पुरली! दर दोन–तीन दिवसांनी ती धुऊन औषध लावावे लागे. प्रेमळ कुटुंबियांपासून दूर, शक्ती कमी कमी होत चाललेली, एकाकी जीवन, शरीर पंगु झालेले; पण अशाही स्थितीत त्यांनी धीर सोडला नाही व पाटसकरांच्या टोमण्याने दुखावलेल्या कात्र्यांनी बरे झाले असूनही कुष्ठांच्या सेवेत उरलेले आयुष्य घालवण्याचा दृढनिश्चय केला! जवळ ना पैसा, ना कोणी मदतनीस; पण ते खचले नाहीत! ते महाराष्ट्रातून अमरावतीहून परत मध्यप्रदेशात आले व जेथे पूर्वीचा ख्रिस्त्यांचा कुष्ठाश्रम होता, त्याच भागात त्यांनी आश्रम काढण्याचे मोठ्या जिद्दीने ठरवले. हा भाग अरण्यात होता. भोवताली आदिवासींची सर्व वस्ती. तेही अडाणी, अशिक्षित, गरीब, रोगग्रस्त, दयनीय अवस्थेत जगणारे!

प्रथम त्यांनी भिक्षा मागण्यास सुरुवात केली. कोणी पाच पैसे द्यावेत, कोणी दहा पैसे द्यावेत, कोणी मूठभर तांदूळ द्यावेत. वर्षानुवर्षे पायी, सायकलवरून उन्हात, पावसात, जिवाची पर्वा न करता, स्वतःच्या थकलेल्या, दुर्बल होत चाललेल्या शरीराची, सतत वाहाणाऱ्या पायाच्या जखमेची यत्किंचितही फिकीर न बाळगता ते भिक्षा मागत हिंडत राहिले! खायला मिळाले न मिळाले. चहा प्यावा, चार फुटाणे पोटात ढकलावेत. बसस्टॅंडवर, रेल्वेस्टेशनवर रात्री झोपेसाठी जमिनीवर अंग टाकावे. कारण त्यांना घरात कोण आश्रय देणार होते? अशा स्थितीत त्यांनी श्रीरामकृष्ण परमहंसांच्या नावाने 'श्री रामकृष्ण सेवा आश्रम, सोंठी' उभा केला.

ज्या भागात ख्रिस्ती प्रसारकांचे कार्य ऐंशी-नव्वद वर्षे चालू होते अशाच भागाची त्यांनी निवड केली व तोडीस तोड म्हणून आपला आश्रम उभा करून, पाटसकरांच्या टोमण्याला उत्तर दिले. पै, पैसा करता करता त्यांनी दोन–तीन हजार रुपये जमविले हे पाहून लोकांनी त्यांच्यावर टीका करण्यास सुरुवात केली. हजारो रुपये भीक मागत जमवून अखेर हा मनुष्य पैसे घेऊन कोठे तरी पळून जाणार अशीही निंदानालस्ती सुरू झाली; पण ते दुःखी झाले नाहीत किंवा त्यांनी आपले कार्यही सोडले नाही. स्वतःचा चरितार्थ स्वतःच्या पेन्शनवर व रुग्णांचा चरितार्थ ह्या भिक्षेवर असा क्रम त्यांनी सुरू केला. आरंभी त्यांच्या आश्रमात फक्त तीन रुग्ण होते. सोंठी किंवा चाम्पा हा भाग वैराण आहे. तेथे त्यांनी स्वतःकरता व रोग्यांकरता स्वतःचे तीन हजार रुपये खर्च करून, एक लाकडाची झोपडी उभी करून तेथे ते रुग्णांसह राहू लागले; पण दयाळू अंतःकरणाच्या लोकांच्या दृष्टीतून त्यांचे हे महान कार्य सुटले नाही. त्यांच्या त्या निःस्वार्थी, वर्षानुवर्ष केलेल्या सेवेने लोकांचे लक्ष त्यांच्याकडे लागले व 'पंडितजी' ह्या नावाने ते सर्वत्र प्रसिद्धीला आले. गरिबातले गरीब लोकसुद्धा–हमाल, शेतकरी, रिक्षावाले त्यांना मानू लागले. परमेश्वरालासुद्धा त्यांची ही घोर तपस्या पाहून दया आली व श्रीमंत व्यापारी त्यांना हजारो रुपये देऊन मदत करू लागले. 'पंडितजी' ही पदवी त्यांना मिळण्याचे कारण ते भिक्षा मागताना तुलसीरामायणातील दोहे म्हणत.

श्री. कात्रे हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक होते. गोळवलकर गुरुजींचा व त्यांचा बेताताच, अगदी एक–दोनदाच संबंध आला व त्यांनी कात्र्यांना उत्तेजन दिले. एवढेच नव्हे, तर स्वतःची बेचाळीस एकर जमीनही दिली! "समाजजागृतीचे हे एक कार्य आहे, तेव्हा समाज तुमची परीक्षा पाहील हे लक्षात ठेवा! एका माणसाकडून एक लक्ष रुपये मिळविण्यापेक्षा एक लक्ष माणसांकडून एकेक रुपया जमा करून लक्ष रुपये मिळविणे जास्त चांगले. कारण जनजागृती चांगली होते व एक लक्ष लोकांचे ध्यान तुमच्याकडे जाते!" असाही त्यांनी कात्रेजींना उपदेश केला. मात्र गुरुजी कात्र्यांच्या आश्रमाशी जरा दुरूनच संबंध ठेवीत. हेतू एवढाच होता की, संघावरला व गुरुजींच्यावरला सरकारचा व राजकारणी पुढाऱ्यांचा राग आश्रमाला बाधू नये.

तुलसीरामायणाचा अभ्यास कात्र्यांनी मुद्दाम केला व "जीवो जीवस्य जीवनम्" ह्या वचनाचा अर्थ त्यांनी निराळाच लावला. ते म्हणत "जीवो जीवस्य जीवनम्" ह्या वचनाचा अर्थ एका जीवाने, एका माणसाने आपले जीवन, आपले सर्व आयुष्य दुसऱ्या जीवाकरता दुसऱ्या माणसाकरता खर्च करावे. नेहमीच्या रूढ अर्थापेक्षा हा अर्थ अगदीच निराळा, अगदीच अनपेक्षित होता; पण तो त्यांच्या सेवेतून, धडपडीतून, अनुभवातून निघाला होता.

रोग बरा झाल्यामुळे कात्र्यांच्या कुटुंबातील मंडळी, त्यांचे जावई त्यांना घरी येऊन राहण्यास सांगत होते; पण ते त्यांनी ऐकले नाही. त्यांनी आपले शरीर, आपले सर्व जीवन कुष्ठाश्रमालाच अर्पण

ण्याचे ठरवले होते. पायाची बोटे वाकडी झालेली, पायाची जखम वाहातीच आहे, अशा स्थितीत पायी अगर सायकलवरून, ऊन,पाऊस वारा, थंडी ह्यांची पर्वा न करता हा महात्मा पै–पैसा जमवीत रोज दहा दहा मैल हिंडत होता! नाना तऱ्हेची संकटे आली; पण हा महात्मा डगमगला नाही! हा कार्यक्रम थोडाथोडका नाही, १९६२ ते १९७६ पर्यंत १४ वर्षे चालू होता, शरीर कणकण चौदा वर्षे झिजत होते. जीवन क्षणक्षण चौदा वर्षे घटत होते. आरंभीच्या तीनचार रुग्णांचे चाळीस-पंचेचाळीस कुष्ठरोगी झाले होते. साठ एकर जमीन मिळाली होती. तीत विहिरी खणल्या गेल्या होत्या. रुग्णांच्या मदतीने नापीक, माळरान जमीन खणली, नांगरली, कुळवली जात होती. विहिरीच्या पाण्यावर पिके पोसली जात होती. एक हिरवेगार नंदनवन उभे राहात होते. शेती सुरू झाली होती. गोरक्षण चालू होते. पाच–सहा इमारती उभ्या राहिल्या. हे सर्व एका कुष्ठरोगी माणसाने जिद्दीने केले होते. पुढे पुढे मदतीचा ओघ सुरू झाला. सर्वश्री जीवनलाल साब, डॉ. गोदावरीश शर्मा, दा. ग. बापट वगैरे निरोगी मंडळी येऊन मदत करू लागली. ह्यापैकी काही मंडळी तर कुष्ठरोग्यांमध्येच राहात, वावरत. त्यांच्यामध्येच त्यांच्या हातचे खातपीत. ह्यापेक्षा जास्त त्याग काय असणार? अखेर तो क्षण जो सर्वांच्याच जीवनात येतो तो आला! कात्रेजी विकलांग होऊन खाटेवर पडले होते. जवळ गोळवलकर गुरुजींचे छायाचित्र होते. त्याकडे पाहात, गुरुजींना हात जोडून

मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरीम्।
यत्कृपा तमहं वंदे परमानंदमाधवम्॥

हा श्लोक म्हणू लागले. ज्यांच्यापासून त्यांना ही स्फूर्ती झाली; प्रेरणा मिळाली त्या गुरुजींना ते कधीही विसरले नाहीत. त्यांचे छायाचित्र सदैव त्यांच्या खाटेपाशी असे. जीवन कृतार्थ झाले होते. सुरकुत्या पडलेल्या त्या काळसर चेहऱ्यावर आनंदाचे हास्य विलसत होते. "धन्योऽहम्, धन्योऽहम्" हे शब्द सदैव मुखावाटे बाहेर पडत होते. ते म्हणत मी काही लोकमान्य, महात्माजी, सावरकर ह्यांच्यासारखा मोठा मनुष्य नाही. मी एक साधा कारकून! मी ह्याच्यापेक्षा जास्त ते काय करणार? जनताजनार्दनाने मला माझ्या कार्याला लाखो रुपये दिले. बस झाले! जीवन कृतार्थ झाले! धन्य झालो. धन्य झालो! शंकराचार्य, राष्ट्रपति राधाकृष्णन्, गिरी, झाकीर हुसेन, पंतप्रधान लालबहादूर शास्त्री, राज्यपाल पाटसकर इत्यादी बडी मंडळी ह्या एकाकी कुष्ठरोग्याचे कार्य पाहून आश्चर्याने थक्क झाली! मग इतरांची कथा काय? ह्या सर्व बडचाबडचा मंडळींचे आश्चर्य, सहानुभूती ही निष्क्रिय नव्हती. दानाचा ओघही त्यांच्याकडून नंतर हळूहळू सुरू झाला.

अखेर १६ मे १९७७ साली ह्या महात्म्याने आपण एवढचा कष्टाने उभारलेल्या आश्रमातच प्राण सोडला! तो घराकडे गेला नाही किंवा घरातल्या बायकामुलांकडे त्याने दृष्टिक्षेपही केला नाही!

एके काळी आपल्याप्रमाणेच युरोपमध्येही पुष्कळ कुष्ठरोगी होते; पण आता त्या रोगाचा युरोपियन लोकांनी समूळ नाश केला आहे. आता युरोपमध्ये एकही कुष्ठरोगी औषधालासुद्धा शिल्लक नाही! आपल्या देशात मात्र त्यांची संख्या सुमारे तीस–चाळीस लाख आहे व त्यापैकी महाराष्ट्रात तीन-चार लक्ष लोक आहेत. दुर्दैवाने ही संख्या वाढत आहे इकडे महात्माजींच्या नावाचा उद्घोष करणाऱ्या त्यांच्या शासनातील अनुयायांचे बिलकुल लक्ष नाही. ते सत्तेच्या राजकारणात गुंतलेले आहेत. मानासाठी, पैशासाठी हपापलेले आहेत! आपल्या आदर्शांचा नाश तेच स्वतः करीत आहेत.




लेखक : पु. ल. इनामदार । मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०

हे लिहीत असताना महात्माजींची एक गोष्ट आठवते. महात्माजी स्वतःच्या हातांनी कुष्ठाची–परचुरेशास्त्री–ह्यांची सेवा करीत. ही गोष्ट जवाहरलालना आवडत नसे. असे केल्याने 'तुम्हालाही हा रोग जडेल!' असे त्यांचे सांगणे असे. ह्यावर महात्माजी काय उत्तर देत ते हृदयावर कोरून ठेवण्यासारखे आहे. ते त्यांना उत्तर देत, 'कुष्ठांची सेवा करता करता मला कुष्ठरोग जडला तर मी आनंदाने नाचेन!'

हा रोग युरोपमधून नष्ट करण्याकरता युरोपियन लोक सर्व कुष्ठरोगी कोणत्या तरी एखाद्या निर्जन ओसाड बेटावर धाडीत. तेथे ते औषधपाण्यावाचून हाल होऊन प्रथम प्रथम मरत. ही त्यांची अनुकंपनीय स्थिती पाहून फादर डेमियन नावाचा एक ख्रिस्ती प्रसारक त्या बेटावर जाऊन त्या रोग्यांची शुश्रूषा करू लागला व ही त्यांची शुश्रूषा त्याने अनेक वर्षे केली व त्यातच त्याला हा रोग जडून फादर डेमियन त्या बेटावर त्या रोग्यांमध्येच मरण पावला! फादर डेमियनचा त्याग अतुलनीय होता, अद्वितीय होता. हाच कुष्ठरोग्यांचा पहिला सेवक! त्याचे उदाहरण पाहून पुढे अनेक युरोपियन लोक ह्या कार्यासाठी पुढे आले. त्यातील काही आपल्या देशात येऊन कुष्ठरोग्यांची सेवा करू लागले. आपल्यापैकी कोणाचेच लक्ष पूर्वी इकडे नव्हते. 'आत्मा अमर आहे, शरीर नाशिवंत आहे,' असा वरचेवर मोठ्याने उद्घोष करणारे आपण, आपल्याला हा रोग जडू नये म्हणून त्यांच्यापासून फटकून वागत होतो. त्यांना घरातून हाकलून देत होतो. हालहाल होऊन मरताना पाहूनही आपल्याला त्यांची दया येत नव्हती. फादर डेमियनची कामगिरी पाहून आमच्या माना लाजेने खाली जात होत्या; पण सुदैवाने आता ही स्थिती पालटत चालली आहे. महात्माजींच्या व विनोबांच्या प्रेरणेने, आमटे, डॉ. पटवर्धन, बंडोरवाला, कात्रे, बापट वगैरे इतर अनेक मंडळी स्वतःच्या स्वास्थ्याची काळजी न करता ह्या कार्यास आपले सर्वस्व वाहून घेत आहेत ही आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे. लाजेने खाली गेलेल्या माना आता ताठ होत आहेत व छात्या अभिमानाने, आनंदाने भरून येत आहेत; पण एवढेच करून भागणारे नाही. महागाई भयंकर वाढत आहे. पगारवाढ, महागाईवाढ, बोनस ह्यासाठी आपण संप करीत आहोत, मोर्चे काढीत आहोत व त्याचा परिणाम म्हणून आपली सांपत्तिक स्थिती सुधारून आपण सधन बनत चाललो आहोत; पण ही महागाई काय आपल्यापुरतीच आहे? हिची झळ कुष्ठरोग्यांच्या संस्थांना लागत नसेल का? हा विचार आपल्या मनात नको का यायला? व हा विचार मनात येऊन आपला दानौघ ह्या संस्थांकडे वळायला नको का? का ह्या रोग्यांना अन्नपाण्यावाचून, औषधोपचारावाचून, तडफडत, हाल भोगीत मरू द्यायचे? हा विचार मनात येऊन आपला दानौघ इकडे वळेल तो सुदिन!

आज जर मध्यप्रदेशातील बिलासपूर जिल्ह्यातील चाम्पा गावी जाल तर भारतातून हा रोग समूळ नष्ट करण्यास कटिबद्ध झालेल्या भारतीय कुष्ठ निवारक संघाचा कात्रे ह्यांनी स्थापून वाढविलेला 'श्रीरामकृष्ण सेवा आश्रम' तेथे दिसेल व तेथेच मोठ्या अक्षरात लिहिलेली पाटी दिसेल–

**"आम्ही आमच्या मातृभूमीच्या**
**गौरवार्थ सतत झटत राहू!"**

अशा तऱ्हेने आपले सर्व जीवन, सर्वस्वी दुर्बल, उपेक्षित घटकाकरिता खर्च करणारे किती लोक, कोणत्या राजकीय पक्षात आहेत ह्याचा संघाची निंदा–नालस्ती करणाऱ्या लोकांनी शोध घ्यावा व मग असे लोक तयार करणारा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ वाईट की चांगला ते ठरवावे. ☐

---

संदर्भ क्रमांक ९८४/३/८०                दिनांक १।५।१९८०

संपादक 'माणूस'

स. न.

'या क्षेत्रातील दुष्काळाची दखल आपल्या प्रभावी माध्यमातून घेऊन उदार वाचक बांधवांनी अक्षरशः सद्भावनांचा अमृतवर्षाव केल्यामुळे कुष्ठकार्यकर्त्यांची व कुष्ठरुग्णांची निस्तेज झालेली मने पुन्हा सतेज झाली. क्षणभराकरिता सर्वांनाच पावसाभावी दुष्काळ पडला असल्याचे विस्मरण झाले.

कुष्ठरोग व कुष्ठसमस्या ह्या दोहोंचा या क्षेत्रातील बहुजनसमाज उपेक्षाच करीत आलेला आहे. ह्या दुष्काळाची झळ लहानथोर सर्वच स्तरांतील घटकांना लागलेली असल्यामुळे दुष्काळाच्या संकटातून निभावून जाण्यास त्यांचा सहयोग मिळणे अशक्यच होते: अशा असहाय परिस्थितीत महाराष्ट्राच्या उदात्त हृदयाचे स्मरण झाले व आपल्याकडे धाव घेतली.

आपल्या असीम कृपेमुळे या कुष्ठसेवा–कार्यास अनेकानेक उदात्त हृदये जोडली गेल्याने एक नवीनच आत्मविश्वास निर्माण झाला. कुष्ठसमस्येशी होत असलेल्या संघर्षात आम्ही एकटेच नसून आमचे अनेकानेक जागृत राष्ट्रबांधव आमच्या मागे उभे आहेत ही जाणीव दृढ झाली.

भविष्यात देखील आपला सहयोग मिळत राहावा ही प्रार्थना. कुष्ठकार्यकर्त्यांनी व कुष्ठरुग्णबांधवांनी आपणास नमस्कार सांगितले आहेत.

कुष्ठसेवेत सदैव आपला
**दा. ग. बापट**
सचिव
भारतीय कुष्ठ निवारक संघ,
चांपा, जि. बिलासपूर (म.प्र.)

पूर्वांचलाचे आव्हान । लेखांक दुसरा

# चेरापुंजीच्या रामकृष्ण आश्रमावरही हल्ले, दगडफेक...

विनय सहस्रबुद्धे

गेल्या ऑक्टोबर महिन्यात मेघालयात घडलेल्या हिंसक घटना व त्याला स्थानिक खासी विरुद्ध उपरे बंगाली असं स्वरूप देण्याचा प्रयत्न इ. बाबतचा तपशील मागच्या लेखांकात येऊन गेला आहे. राज्याचे मुख्यमंत्री श्री. लिंगडो यांच्या भेटीचा वृत्तांतही त्याच लेखांकात आला होता. श्री. लिंगडो यांच्या मुलाखतीमुळे खासी-बंगाली संघर्षाबाबतची सरकारी भूमिका समजली. सरकारी भूमिकेबरोबरच विरोधी पक्षांचा दृष्टिकोनही जाणून घ्यावा यासाठी मेघालय विधानसभेतील विरोधी पक्षनेते श्री. पी. आर. किंडिया व अन्य एक विरोधी नेते श्री. मार्टिन माजाँ यांची मुद्दाम भेट घेतली.

या भेटीच्या तपशिलात जाण्यापूर्वी मेघालयातील विद्यमान राजकीय परिस्थितीची तोंडओळख करून घ्यायला हवी. आठ वर्षांपूर्वी मेघालयाची निर्मिती होण्याच्या सुमारास कॅ. विल्यमसन संगमा यांच्या नेतृत्वाखालील ऑल पार्टी हिललीडर्स कॉन्फरन्स हा स्थानिक जमातींचा एकमेव पक्ष अस्तित्वात होता. स्वाभाविकच मेघालयाचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान कॅ. संगमा यांनाच मिळाला. प्रारंभापासूनच ए. पी. एच. एल. सी. हा सत्ताधारी काँग्रेसशी मिळतेजुळते धोरण घेत आला होता. पुढे आणीबाणीत कॅ. संगमा यांनी आपला संपूर्ण पक्ष काँग्रेसमध्ये विलीन केला. या विलिनीकरणाला विरोध असणाऱ्यांनी आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवले व आजही या पक्षाला चांगले पाठबळ असून ६० सदस्यांच्या विधानसभेत या पक्षाचे २० सदस्य आहेत व या अधिकृत विरोधी पक्षाचे नेतेपद श्री. किंडिया यांच्याकडे आहे.

१९७८ च्या निवडणुकीत वस्तुतः या ए. पी. एच. एल. सी. ला एकूण ३३ जागा मिळून बहुमत मिळाले होते व श्री. डार्विन प्यू यांच्या नेतृत्वाखाली अविभक्त ए. पी. एच. एल. सी. चे मंत्रिमंडळ काही काळ सत्तेवरही होते; परंतु काही महिन्यांतच मुख्यमंत्री श्री. प्यू यांच्याविषयी कुरबुरी वाढू लागल्या, विरोधी पक्षाकडून प्रलोभने दाखविण्यात येऊ लागली व परिणामतः श्री. बी. बी. लिंगडो यांच्या नेतृत्वाखाली ११ सदस्यांचा एक गट ए. पी. एच. एल. सी. मधून बाहेर पडला. श्री. लिंगडो यांना मुख्यमंत्रिपदाच्या स्वरूपात या पक्षांतराचे बक्षीसही मिळाले. आज ६० सदस्यांच्या मेघालय विधानसभेत मुख्यमंत्री लिंगडो यांना स्वतःबरोबर पक्षांतर करणारे ११ आमदार शिवाय इंदिरा काँग्रेसचे ९, एच. एस. पी. डी. पी. पक्षाचे १३ व जयंतिया नॅशनल युनिटी पक्षाचा १ अशा ३४ आमदारांचा पाठिंबा आहे. विधानसभेत २ जागा रिकाम्या असून विरोधी पक्षात २४ सदस्य आहेत. त्यात ए. पी. एच. एल. सी. चे २०, श्री. मार्टिन माजाँ यांच्या पब्लिक डिमांड इंप्लिमेन्टेशन कमिटी या पक्षाचे २, जनता पक्षाचा १ व अपक्ष १ यांचा समावेश आहे.

पूर्वांचलातील जवळजवळ सर्वच राज्यांत स्थानिक पक्षांचे प्राबल्य आहे. शिवाय एकाच पक्षाला ⅔ वा त्यापेक्षा अधिक बहुमत मिळण्याची इकडची परंपरा दिसत नाही. त्यामुळेच पाच-सहा जणांनी बंडखोरी केली की सरकार गडगडण्यास फारसा वेळ लागत नाही. मेघालयातही मुख्यमंत्री लिंगडो यांचे आजचे सरकार चार-पाच सदस्यांच्या पक्षांतराने गडगडू शकते. गेल्या महिन्यातच राज्यातील राजकीय ताणतणावांमुळे अशी परिस्थिती निर्माण झाली होती. हा धोका ओळखूनच मुख्यमंत्र्यांनी त्या वेळी चालू असलेले राज्यविधान-

सभेचे अर्थसंकल्पी अधिवेशन नियोजित तारखेपूर्वी चार दिवस आधीच आटोपते घेतले व आपली खुर्ची सावरली.

शिलाँगमधील एका बऱ्यापैकी उंच टेकडाळ भागावर पण शहराच्या मध्यवस्तीत उभारलेली 'राज्यविधानसभेची बैठी, उतरत्या छपराची इमारत दुरून खूपच सुंदर दिसते ! या इमारतीतील विरोधी पक्षनेत्यांच्या कार्यालयातच मी श्री. पी. आर. किंडिया यांची भेट घेतली. गेली अनेक वर्षे श्री. किंडिया राजकारणात आहेत. श्री.संगमा व श्री. प्यू या दोन माजी मुख्यमंत्र्यांच्या मंत्रिमंडळातही ते होते. चाळिशी ओलांडलेले श्री. किंडिया स्वत: अद्याप ख्रिश्चन झाले नसले तरी त्यांच्या कुटुंबातील एकूणएक व्यक्ती ख्रिश्चन आहे.

मेघालयातील खासी–बंगाली संघर्षात मुख्यमंत्र्यांनी खासींची, पर्यायाने ख्रिश्चनांची बाजू घेतली हे उघड होते; परंतु विरोधी पक्षनेते श्री.किंडिया यांच्या मते मात्र मुख्यमंत्र्यांचे बंगाल्यांबाबतचे धोरण 'बोटचेपेपणाचे ' आहे. थोडक्यात म्हणजे राजकारणात एकमेकांविरुद्ध असलेल्या या दोन्ही नेत्यांना ख्रिश्चन–खासी विरुद्ध हिंदू–बंगाली यांच्यातील संघर्षात खासींचीच बाजू घ्यावयाची आहे. बंगाल्यांवर जास्तीत जास्त ठीका करून आपली ख्रिश्चन–निष्ठा दाखविण्यातच त्यांच्यात स्पर्धा आहे व या विशिष्ट संदर्भात तेवढ्यापुरतेच ते एकमेकांविरुद्ध आहेत.

माझ्याशी बोलताना अगदी सुरुवातीसच श्री. किंडिया यांनी उपऱ्या बंगाल्यांमुळे मेघालयातील खासींचे स्वतंत्र सांस्कृतिक अस्तित्व धोक्यात आल्याचे सांगून बंगाली व्यापारी खासींची राजरोस आर्थिक पिळवणूक करीत असल्याचा आरोप केला. मेघालयात बंगाल्यांच्या वाढत्या संख्येमुळे खासी व अन्य आदिवासी अल्पसंख्य बनण्याचा धोका निर्माण झाल्याचं सांगून श्री. किंडिया म्हणाले की, अनेक सीमावर्ती गावांमधून बंगाली बहुसंख्य झाले आहेत. मैलाम नावाच्या एका गावात आज स्थानिक जमातीचा एकही नागरिक राहिलेला नाही असा दावाही त्यांनी केला.

अलीकडच्या खासी–बंगाली संघर्षाबद्दल ते म्हणाले की, एका छोटचाशा आणि मामुली घटनेचे भांडवल बंगाल्यांनी केले असून या निमित्ताने खासींना बदनाम करण्याचा हा डाव आहे !

श्री. किंडिया व श्री. माजॉ या उभयतांनी बंगाल्यांच्या सुरक्षिततेसाठी शिलाँगच्या मॅजिस्ट्रेटनी लादलेले निर्बंध अत्यंत जाचक असल्याचे सांगून, 'एखाद्या बंगाल्याच्या मनात असुरक्षिततेची भावना कायम राहिल्यास त्यासाठी खासी जमात–प्रमुखांना (Head Men) जबाबदार धरले जाईल ' हे कलम काढून टाकण्याची आपली मागणी असल्याचं सांगितलं. 'या कलमाचा फायदा घेऊन एखादा बंगाली आपल्याला खरचटलं वा त्याचं बोट कापलं गेलं तरी खासींविरुद्ध तक्रार करू शकेल ' अशी भीतीही श्री. माजॉ यांनी व्यक्त केली.

'सध्याच्या खासींचा लढा म्हणजे बंगाल्यांचे वर्चस्व झुगारून देण्यासाठी भोळ्या-भाबड्या खासींनी चालविलेला स्वोद्धाराचा लढा आहे ' असं सांगून श्री. किंडिया म्हणाले की, सध्याची मेघालयातील शांतता ही 'वादळापूर्वीची शांतता आहे.' 'आपण अपेक्षिता ते वादळ नेमके कोणते व कशा स्वरूपाचे असेल ?' या प्रश्नाला मात्र किंडिया यांनी उत्तर देण्याचे टाळले.

श्री. किंडिया व श्री. माजॉ यांच्याशी इतरही अनेक विषयांवर सविस्तर गप्पा झाल्या. श्री. माजॉ यांनी गप्पांच्या ओघात आपण मूळचे दक्षिण भारतीय असल्याचं सांगितलं. शिवाय पुण्याच्या डेक्कन कॉलेजचे आपण विद्यार्थी होतो असं सांगून पुण्याच्या हवामानाची खूप प्रशंसाही केली. मेघालय विधानसभेच्या विरोधी पक्षनेत्याच्या ज्या कार्यालयात आमच्या गप्पा झाल्या ते कार्यालय मोठे प्रशस्त आहे आणि कडाक्याच्या थंडीशी सामना करण्यासाठी खुर्चीसमोरच शेकोटी धगधगत ठेवण्याची सोयही केलेली होती.

## खासींच्या ख्रिस्तीकरणाचा परिणाम

शिलाँगमधील या खासी-बंगाली–संघर्षातील बंगाल्यांची बाजू समजून घेण्यासाठी शिलाँग टाइम्सचे तरुण संपादक श्री. मानस चौधरी यांनाही भेटलो. श्री. चौधरी यांच्या घराण्यात पत्रकारितेची परंपरा चालत आली असून श्री. मानस चौधरींच्या वडिलांनी स्थापन केलेले हे साप्ताहिक गेले पस्तीस वर्षे अव्याहतपणे सुरू आहे. स्वतः श्री. चौधरींचे वडील १९३५ च्या सुमारास बांगला देशातून शिलांगमध्ये येऊन स्थायिक झाले आहेत व आपण आता मेघालयाचेच नागरिक असल्याचा त्यांचा दावा असून तो पटण्यासारखा आहे.

"बुद्धी आणि व्यापारातील कौशल्य यांच्या बळावर आपल्या सार्वभौम सत्तेत बंगाली मंडळी वाटा मागतील व आज आपली 'हम करे सो कायदा ' वृत्ती आपल्याला बदलावी लागेल, या भीतीपोटी ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रेरणेतून ख्रिस्ती खासींनी बंगाल्यांशी भांडण उकरून काढले आहे," अशा स्पष्ट आरोपापासूनच श्री. चौधरींनी गप्पांना सुरुवात केली. केवळ बंगाल्यांनाच नव्हे तर मारवाडी आणि जैन व्यापारांना सुद्धा सतावून त्यांना मेघालय सोडण्यास भाग पाडण्याचा ख्रिस्ती खासींचा इरादा असल्याचं सांगून श्री. चौधरी म्हणाले की, उर्वरित भारतातील लोकांपासून ख्रिस्ती खासी शक्य तेवढे दूर रहावेत यासाठी ख्रिश्चन मिशनरी शक्यते सर्व प्रयत्न करीत आहेत. हे त्यांचे प्रयत्न यशस्वी होण्यावरच ख्रिश्चन स्टेटची निर्मिती अवलंबून आहे !

खासींचे सांस्कृतिक वेगळेपण कायम राखण्याच्या नावाखाली आज मेघालयात येणाऱ्या इतरेजनांवर अनेक निर्बन्ध लादण्यात आले आहेत. खासी वा अन्य मेघालयीन जमातींव्यतिरिक्त अन्य भारतीयांना मेघालयात मालमत्ता विकत घेणे, नवा व्यवसाय सुरू करणे इ. कायदेशीर अनुमती नाही. परिणामतः अनेक श्रीमंत खासी अर्धापाऊण डझन घरांचे मालक बनतात आणि बंगाल्यांना भरमसाठ भाडे भरून त्यात रहावे लागते. भारतातील अन्य राज्यांप्रमाणे अनुसूचित जाती–जमाती वा हरिजनांसाठीही मेघालयात कोणत्याही सवलती नाहीत, इ. माहितीही श्री. चौधरी यांनी दिली.

'बंगाल्यांच्या वाढत्या लोकसंख्येमुळे मूळ खासींचे सांस्कृतिक वेगळेपण वा वैशिष्ट्ये यांना धोका पोचतो, या श्री. पी. आर. किंडिया यांच्या आरोपाची थट्टा करून श्री. चौधरी म्हणाले की, "आज बहुसंख्य खासी ख्रिश्चन झाले आहेत व ख्रिश्चन होताच त्यांच्या पाश्चात्यीकरणाची प्रक्रिया सुरू होते. तेव्हा एकदा ख्रिश्चन धर्म स्वीकारला की खासींचे तथाकथित सांस्कृतिक वेगळेपण संपुष्टात येते. अशा स्थितीत खासींच्या सांस्कृतिक वेगळेपणाचे रक्षण करायचे

असेल तर आधी ख्रिश्चनांवर निर्बंध घालायला हवेत; बंगाल्यांवर नव्हे ! ''

ख्रिश्चन खासींच्या मनात बंगाल्यांविषयी द्वेष निर्माण व्हावा यासाठी सरकार व ख्रिश्चनांचे अन्य हितसंबंधी हेतुपुरस्सर प्रयत्न करीत असल्याचं सांगून श्री. चौधरी म्हणाले की, अलीकडेच श्री. मार्टिन माजों यांनी शिलाँगमध्ये दुर्गापूजांचं प्रमाण उत्तरोत्तर वाढत असल्याबद्दल चिंता व्यक्त करून त्या थोपविण्याबाबत खासी जनतेला प्रकट आवाहन केलं होतं. बंगाल्यांविषयीच्या या द्वेषापोटीच खासी संघटना आपल्या कार्यक्रमांची प्रसिद्धिपत्रके बंगाली नियतकालिकांना कधीच देत नाहीत, असंही श्री. चौधरी म्हणाले.

सबंध पूर्वांचलातील ख्रिश्चनांच्या हालचालींचं 'देशाचे तुकडे पाडणारं राजकारण', अशा शब्दात वर्णन करून श्री. चौधरी म्हणाले की, ख्रिश्चन मिशनरी या भागात विघटनवादी कारवाया करू शकतात यामागे उर्वरित भारतानं सबंध ईशान्य भारताकडे केलेलं दुर्लक्ष हे एक महत्त्वाचं कारण आहे. भौगोलिकदृष्ट्या हा भाग एका बाजूला पडला असला तरी मानवी प्रयत्नातून हे अंतर भरून काढणं कठीण नाही. देशातील फक्त दोन राष्ट्रीय वृत्तपत्रांचे पूर्ण वेळ आणि एका वृत्तपत्राचा अर्धा वेळ प्रतिनिधी शिलाँगमध्ये आहे. यावरून उर्वरित भारताने केलेलं दुर्लक्षच सिद्ध होतं, असंही श्री. चौधरी म्हणाले. हा भाग भारताच्या मूळ सांस्कृतिक प्रवाहात मिळावा यासाठी या भागात दूरदर्शनकेन्द्रे उभारण्यात यावीत व विकासाचा समतोल राखण्यासाठी ईशान्य भारत विकास महामंडळ वा तत्सम सरकारी संस्था स्थापन करावी अशा दोन मौलिक सूचनाही श्री. मानस चौधरी यांनी केल्या.

शिलाँगमधील बंगाल्यांचे एक अन्य नेते डॉ. सुव्रत दास यांनाही मी भेटलो. डॉ. दास दंगलग्रस्त बंगाल्यांच्या पुनर्वसन समितीचे प्रमुख असून बंगाल्यांमध्ये त्यांना मोठा मान आहे. श्री. दास यांच्या सांगण्यानुसार सुमारे दोन हजार बंगाली अलीकडच्या दंगलीत बेघर झाले व अद्याप सरकारीरीत्या त्यांच्या पुनर्वसनासाठी काहीही केले जात नाही. राज्यातील विविध सरकारी शाळांतून बंगाल्यांची तात्पुरती सोय केली आहे; परंतु दुसरीकडून शिक्षणखात्याने शाळा लवकर सुरू करण्याबाबत तगादा लावला आहे. परिणामतः लवकरच बंगाल्यांवर पुन्हा बेघर होण्याची पाळी येईल अशी माहिती श्री. दास यांनी सांगितली.

श्री. दास व श्री. मानस चौधरी या उभयतांच्या बोलण्याचा रोख मुख्यतः खासींच्या वाढत्या ख्रिस्तीकरणाविरुद्ध होता. मूलतः खासी जमातीचे लोक अतिशय स्नेहशील व मनमिळाऊ स्वभावाचे असल्याचा उभयतांचा अनुभव आहे. या भागातील ख्रिश्चनांच्या हालचाली देशाच्या एकात्मतेस घातक असल्याचंही उभयतांचं मत असून ख्रिश्चन मिशनरी हिंदूविरुद्ध अनेक घातपाती योजनांमध्ये सक्रिय असल्याचा आरोपही या दोघांनी केला. श्री. दास वा श्री. चौधरी यांपैकी कोणीही रा. स्व. संघाशी संबंधित नाही हेही मुद्दाम नमूद केले पाहिजे !

श्री. दास व श्री. चौधरी यांनी ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या कारवायांवर केलेल्या आरोपांची शहानिशा करण्यासाठी जे प्रयत्न केले त्यातून मिळालेली माहिती सुन्न करणारी आहे. भारतीयांच्या धार्मिक सहिष्णुतेचा गैरफायदा कोणत्या टोकापर्यंत व कशाप्रकारे घेतला जाऊ शकतो याची उदाहरणं जरा चौकशी करता मेघालयात ठिकठिकाणी मिळतील. सतत अहिंसेचा पुरस्कार करणाऱ्या भगवान येशू ख्रिस्ताच्या तत्त्वाचे प्रचारकच हिंसेला उत्तेजन देत असल्याची व हिंदूंना सळो की पळो करून सोडण्यासाठी अत्यंत अमानुष प्रकारांचा वापर करीत असल्याची कित्येक उदाहरणं इथं आढळतात !

## रामकृष्ण मिशनचा छळ

गेल्या वर्षीच मेघालयातील चेरापुंजीच्या रामकृष्ण आश्रमाला सतावण्याचे उद्योग ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रेरणेने झाले, त्याची हकीगतही संतप्त करणारी आहे. या भागात रा. स्व. संघाचं काम आहेच; पण त्याहीपेक्षा रामकृष्णआश्रम अधिक सुस्थापित आहे. चेरापुंजी हे एके काळी पावसाच्या सर्वाधिक सरासरीबद्दल प्रसिद्ध असलेलं ठिकाण असून या ठिकाणी रामकृष्णआश्रमाचं एक मोठं केन्द्र आहे. आश्रम, प्रशाला आणि रामकृष्ण परमहंसांच्या तत्त्वज्ञानाचं अभ्यासकेंद्र असा व्याप असलेल्या या आश्रमाचे प्रमुख स्वामी गोकुलानंद हे आहेत. गेल्या वर्षीच, मुख्यमंत्री श्री. डार्विन प्यू यांच्या कारकीर्दीत मिशनऱ्यांच्या प्रेरणेने स्थानिक प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी अचानक आश्रमाचा पाणीपुरवठा बंद केला ! स्वामी गोकुलानंद व त्यांच्या सहकाऱ्यांनी पाणीपुरवठा सुरू व्हावा यासाठी जिल्हाधिकारी, मुख्यमंत्री, राज्यपाल इ. सर्वांची दारे ठोठावली; पण कोरड्या आश्वासनाखेरीज काहीही मिळाले नाही ! सुमारे तीन आठवडे आश्रमात पाण्याची तीव्र टंचाई होती. आश्रमापासून बऱ्याच दूर अंतरावर असलेल्या विहिरीतून पाणी आणून आश्रमवासीयांनी कशीबशी तग धरली. शेवटी अंतिम उपाय म्हणून रामकृष्णआश्रमाच्या दिल्लीतील अधिकाऱ्यांनी तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाईंचे लक्ष या गोष्टींकडे वेधविले. खुद्द स्वामी गोकुलानंदांनीही तारेने ही हकीकत पंतप्रधानांना कळविली. परिणामतः मोरारजीभाईंनी थेट मुख्यमंत्र्यांशी संपर्क साधून त्यांना तंबी दिली, तेव्हा कुठे पाणीपुरवठा पूर्ववत सुरू झाला !

पण या आश्रमाचे दुर्दैव इथेच संपत नाही ! या घटनेनंतर काही दिवसांनीच स्वामी गोकुलानंद यांच्या उपासना–मंदिरात गावठी बाँबचा स्फोट घडवून आणण्यात आला. सुदैवाने, उपासनेची वेळ असूनही काही कारणाने स्वामी त्या वेळी उपासनामंदिरात नव्हते, म्हणून बचावले ! या सर्व प्रकारामागे स्वामींच्या हत्येचा हेतू उघड होता. शिवाय रामकृष्णमिशन व तत्सम हिंदू सेवा-संघटनांच्या कार्यकर्त्यांचे नीतिधैर्य खच्ची करावे असाही दृष्टिकोन असणारच !

मिशनच्या कार्यकर्त्यांना या ना त्या प्रकारे सताविण्याचे ख्रिश्चनांच्या प्रेरणेने सुरू असलेले उद्योग आजही सुरू आहेतच. गेल्या नोव्हेंबरच्या २१ तारखेस अचानक काही खासी तरुणांनी रामकृष्णमिशनच्या शिक्षकांच्या निवासस्थानावर हल्ला केला. त्याआधी बाजारातून परतणाऱ्या मिशनच्या एका कार्यकर्त्यावर भर रस्त्यात चाकूहल्ला करण्यात आला होता व रात्री शिक्षकांच्या निवासस्थानांवर दगडफेकही झाली. खासी तरुणांनी घराघरात शिरून शिक्षकांना दोन दिवसात चेरापुंजी सोडून जाण्याच्या धमक्या

दल्या. हा सर्व प्रकार काही आश्रमवासी यांनी लगेचच स्थानिक खासी जमात-प्रमुखाच्या कानावर घातला; पण उपयोग शून्य !

दि. २२ नोव्हेंबरला सकाळी चेरापुंजीत सर्वत्र खासी भाषेत दोन प्रकारची पोस्टर्स लावलेली दिसली; 'बंगाल्यांना हाकलून लावा!' आणि 'राज्यातील अस्थिरतेमुळे परीक्षेवर बहिष्कार टाका!' इ. आवाहने या पोस्टर्समधून करण्यात आली होती. याच दिवशी रात्री ११ वाजता आश्रमाच्या इमारतींवर पुन्हा एकदा तुफानी दगडफेक करण्यात आली व काही ठिकाणी–विशेषतः साधूलोकांच्या–शयन-गृहांवर, काही स्फोटक पदार्थही फेकण्यात आले. हा सर्व प्रकार खासी जमातप्रमुखांच्या आदेशाशिवाय थांबणार नाही हे लक्षात घेऊन काही आश्रमवासी संन्याशांनी जमात-प्रमुखांची भेट घेतली; पण 'आपण हे थांबवू शकत नाही.' असे सांगून जमातप्रमुखानं संन्याशांची बोळवण केली. जमातप्रमुखाच्या घरून संन्यासी आश्रमाकडे परतत असताना काही अज्ञात इसमांनी अंधारातच त्यांच्यावर तीक्ष्ण धारेच्या शस्त्राच्या सहाय्याने हल्ला केला. आश्रमवासीयांनी त्यांच्यावर प्रतिहल्ला चढविताच हल्लेखोर पळून गेले. मात्र त्यांच्या टोळीत असलेला एक मुलगा मात्र आश्रमवासीयांच्या हाती लागला. चौकशीअंती हा मुलगा ख्रिस्ती मिशनच्या शाळेचा विद्यार्थी असल्याचं समजलं !

रामकृष्ण आश्रमाला सतावण्याचे प्रकार इथेच संपले नाहीत. दि. २३ च्या सायंकाळी आश्रमाच्या अभ्यासमंदिराला काही तरुणांनी गुपचूप आग लावून दिली व ते पळून गेले. या सर्व प्रकारचं गाऱ्हाणं घेऊन आश्रमाचे चालक पोलिसांकडे गेले तेव्हा पोलिस उप-आयुक्तांनी पोलीस तैनात केले; परंतु काही काळ आश्रमशाळा बंद ठेवा असंच त्यांचं आग्रहाचं सांगणं होतं.

या प्रकारानंतर सुमारे महिनाभराच्या आतच दि. १३ डिसेंबरला बोको या एका गावात मेघालय विधानसभेचे बंगाली भाषी सदस्य आमदार श्री. माणिक दास, माजी आमदार श्री. पर्सिलीना मराक व या उभयतांच्या जीपचा ड्रायव्हर या तिघांचा नजीकच्याच एका जंगलात खून करण्यात आला ! या खळबळजनक घटनेची उच्च पातळीवरून चौकशी झाली. राज्यपाल श्री. लालन प्रसाद सिंग यांनी आपल्या प्रजासत्ताकदिनाच्या भाषणातही तिचा उल्लेख केला व 'प्रत्यक्ष खून आसामात घडला असला तरी त्याचे मूळ मेघालयात असल्याचे' मत व्यक्त केले. मेघालयाचे पोलीसमहानिरीक्ष श्री. ए. रहमान यांनी ही बाब मान्य करून यामागे राजकारण असल्याचा संशय व्यक्त केला.

तपासाची चक्रे वेगाने फिरू लागल्यावर गेल्या फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यातच आसामात सिलचरजवळ एका जंगलात पोलिसांनी एक जीप ताब्यात घेतली व या खुनात हात असल्याच्या आरोपावरून एक ख्रिश्चन पाद्री रेव्ह. एच. लामेर यांना अटक केली. मेघलयातील जोवाई गावी काम करणारे श्री. लामेर मूळचे अमेरिकन नागरिक आहेत.

तूर्त मेघालयातील वातावरण काहीसे निवळले असले तरी बंगाली व विशेषतः हिंदूंच्या मनातील असुरक्षिततेची भावना अद्याप नष्ट झालेली नाही. वाढते हिंसक प्रकार व त्याचा संपूर्ण छडा न लावण्याचे सरकारी धोरण याचाच हा परिणाम आहे. स्वाभाविकच सरकारी आशीर्वादाने बंगाल्यांना सळो की पळो करून सोडायच्या या तंत्रामागे 'ख्रिश्चन स्टेट' साकारण्याची कल्पना आहे ही गोष्ट लक्षात येण्यास वेळ लागत नाही.

ख्रिश्चनांच्या वाढत्या प्रसारास व प्रामुख्याने खासींच्या वाढत्या ख्रिस्तीकरणास पायबंद घालण्यासाठी श्री. जीवन रॉय यांनी सुरू केलेल्या सेंग खासी चळवळीची प्राथमिक ओळख मागच्या लेखांकात झाली आहेच. आपल्या ज्ञातिबांधवांच्या वाढत्या ख्रिस्तीकरणामुळे खासींची स्वतःची संस्कृती लयास जात आहे व ख्रिस्तीकरणाचे अन्य सामाजिक दुष्परिणामही होत आहेत, हे लक्षात घेऊन श्री. जीवन रॉय यांनी सेंग खासी चळवळ सुरू केली, ही पार्श्वभूमी पाहता सेंग खासी चळवळीचे महत्त्व असामान्य आहे. या चळवळीचा संक्षिप्त इतिहास, तिची आजची स्थिती व तिचे भवितव्य यांचा विस्ताराने आढावा घ्यायचा तो याचसाठी.

'सेंग खासी' चा अर्थ ढोबळ मानाने अस्सल खासींची चळवळ असा सांगता येईल. या चळवळीचे संस्थापक जीवन रॉय खासींना मूळ भारतीय प्रवाहात आणून सोडण्याच्या कल्पनेने झपाटले होते व त्यांच्या या प्रयत्नांना बाबू शिवचरण रॉय आणि चंद्रनाथ रॉय या आणखी दोन खासीनेत्यांनी साथ दिली. या तिघांच्या पुढाकारानेच २३ नोव्हेंबर १८९९ रोजी सेंग खासी चळवळ स्थापण्यात आली. ही चळवळ स्थापण्यापूर्वीच खासींच्या परंपरागत कथा, धार्मिक विचार व एकूण खासींची सांस्कृतिक वैशिष्टचे याबाबत जीवन रॉय यांनी लिहिलेली 'का किताब शाफांग उवे वेली' आणि 'का निआम जोंग की खासी' ही पुस्तके प्रसिद्ध झाली होती. याशिवाय रामायण व हितोपदेशाचे खासी अनुवादही त्यांनी प्रसिद्ध केले होते. जीवन रॉय यांच्या या कामगिरीमुळेच खासींच्या सांस्कृतिक जागृतीच्या या चळवळीचे शिल्पकार असं त्यांचं यथार्थ वर्णन केलं जातं.

## चळवळीची उद्दिष्टे

सेंग खासी चळवळीची अधिकृतपणे एकूण सात उद्दिष्टे सांगितली जातात. खासींची धार्मिक व सांस्कृतिक स्वायत्तता टिकविण्यासाठी खासींमध्ये मातृभाव वाढवून ऐक्य साधणे, परमेश्वराच्या सार्वभौम सत्तेविषयी खासींमध्ये जागृती निर्माण करणे, सेवाभाव जागता ठेवून खासींना स्वजनांच्या उद्धारासाठी सक्रिय करणे इ. सेंग खासी चळवळीची प्रमुख उद्दिष्टे आहेत. याशिवाय खासींच्या सामाजिक व्यवहारासाठी नीतिमत्तेवर आधारित आचारसंहिता आखून देणे, खासींच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणे, खासींचे परंपरागत खेळ, नृत्ये, उत्सव इ. ना प्रोत्साहन देणे आणि खासींमधील मागास व दुर्बल घटकांसाठी कल्याणकारी योजना आखणे इ. ही या चळवळीचे हेतू आहेत.

सेंग खासी चळवळीचा ध्वज लाल रंगाचा असून त्यात मधोमध वर्तुळाकार पांढरा भाग आहे व त्यावर आरवणाऱ्या कोंबड्याचे चित्र आहे. सेंग खासी चळवळीचे विद्यमान सचिव श्री. उ हिपशॉन रॉय यांच्या 'खासी हेरिटेज' या पुस्तकात या ध्वजाबद्दल सविस्तर माहिती आहे. या पुस्तकात म्हटल्याप्रमाणे पार्श्वभूमीचा लाल रंग हा धैर्याचा सूचक असून वर्तुळकार पांढरा भाग पृथ्वीची कल्पना साकारतो. यावरील कोंबडयाला खासी संस्कृतीत विशेष महत्त्व आहे. 'जीवना-

तील पापकर्मांमुळे जीवनपथ अंधारून गेला आहे व आता पुढे जाण्यासाठी सूर्याच्या प्रकाशाची गरज आहे, त्यासाठीच हा कोंबडा सूर्याला आवाहन करीत आहे' असा या आरवणाऱ्या कोंबड्याच्या चित्राचा अर्थ आहे.

सेंग खासी चळवळीच्या स्थापनेनंतर श्री. जीवन रॉय व त्यांचे चिरंजीव श्री. शिवचरण रॉय या उभयतांनी खासींची परंपरा कायम राखण्याबाबत मोलाची कामगिरी बजावली. विशेषत: खासींची सांस्कृतिक वैशिष्टये भारताच्या मूळ सांस्कृतिक प्रवाहाशी सुसंगत आहेत हे रॉय पितापुत्रांनी ठळकपणे समोर आणले. खासींमध्ये भारतीय राष्ट्रवाद जोपासण्याच्या दृष्टीने 'उ नांगफोरिया' या नावाचं एक मासिकही त्यांनी सुरू केलं. श्री. शिवचरण रॉय हे संस्कृतचे गाढे अभ्यासक होते व त्यांनी प्रमुख भारतीय ग्रंथांचा अभ्यास करून भगवद्गीता व चाणक्य नीतिदर्पण या दोन ग्रंथांचा खासी भाषेत अनुवाद केला. याशिवाय सेंग खासी चळवळीसाठी काही भजने व पदेही शिवचरण रॉय यांनी लिहिली आहेत. ते मेघालयात काँग्रेसचं काम सुरू करणाऱ्यांपैकी एक प्रमुख व्यक्तीही होते. श्री. शिवचरण रॉय यांच्याबरोबरच बाबू राधोनसिंग बेरी, होरमू रॉय दिंगडोह, हाजमो किशोर सिंग, जोशीन तारिआंग इ. चा खासी चळवळीच्या प्रारंभीच्या काळातील प्रमुख नेत्यांमध्ये समावेश होतो. यांपैकी अनेकजण ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या वशीकरणास भुलून काही काळ ख्रिस्तीधर्मात जाऊन, नंतर सेंग खासी चळवळीचे महत्त्व पटल्यामुळे पुन्हा आपल्या मूळ धर्मात आलेले असे होते.

सुरुवातीच्या काळात सेंग खासी चळवळीच्या प्रवर्तकांनी प्रामुख्याने धर्मविषयक चर्चा, व्याख्याने इ. चे कार्यक्रम योजून व आपल्या चळवळीविषयी माहितीपत्रके व पुस्तिका वाटून चळवळीचा प्रचार सुरू केला. शिवाय खासींच्या धार्मिक चालीरीती व रिवाज यांच्या पुनरुज्जीवनासाठी सेंग खासींच्या वतीने विविध पुस्तकेही प्रसिद्ध करण्यात आली. प्राचीन काळापासून खासींमध्ये परमेश्वराचे आभार मानण्यासाठी वर्षातून एकदा एक सामूहिक नृत्य करण्याची प्रथा होती. 'शाद सुक मिन्सिएम' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या नृत्याच्या प्रथेचे सेंग खासींनी पुनरुज्जीवन केले. वसंतऋतूच्या प्रारंभी होणारा हा नृत्याचा वार्षिक कार्यक्रम खासींमध्ये लोकप्रिय झाला व गावोगाव या उपक्रमाला उत्साहवर्धक प्रतिसाद मिळू लागला. या व अन्य उपक्रमांतून सेंग खासी चळवळीची वाढती लोकप्रियता ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या लक्षात आली व त्यांनी त्याविरुद्ध उपाययोजनाही सुरू केली. या सुमारास ज्या मिशनच्या कामाचं जाळं मेघालयात पसरले होते त्याच्या प्रमुखांनी 'शाद सुक मिन्सिएम' मध्ये भाग घेणाऱ्यांवर सामूहिक बहिष्कार टाकण्याचा फतवा काढला; पण या फतव्याचा फारसा परिणाम झाला नाही व फतव्यानंतरही मावखार जैआव व विकिंग या तीन प्रमुख ठिकाणी मोठ्या उत्साहाने सामूहिक नृत्याचे रंगीबेरंगी सोहळे पार पडले.

ख्रिश्चनांच्या पकडीत जाऊ पाहाणाऱ्या आपल्या ज्ञातिबांधवांमधील स्वत्व जागृत करण्यासाठी चंद्रनाथ रॉय आणि नालक सिंग या चळवळीच्या अन्य दोन धुरीणांनी शिलाँगमध्ये नेमबाजी व अन्य परंपरागत युद्धकौशल्याच्या स्पर्धा आयोजित करण्यास सुरुवात केली. शिलाँगमधील सेंग खासी महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती बत्तियाम तिमथाई यांच्याच शब्दात सांगायचे तर सेंग खासी चळवळीचा प्रारंभिक काळ हा खासी समाजजीवनातील एका Renaissance चाच काळ होता.

## शैक्षणिक कार्य

प्रथम खासी भाषेला रोमनलिपी देऊन व नंतर खासींसाठी उघडलेल्या मिशनरी शाळांमधून ख्रिस्ती धर्म खासींवर अतिक्रमण करीत आहे याची यथार्थ जाणीव झाल्यामुळे १९२१ पासून सेंग खासींनी शाळा व बालमंदिरे सुरू करून शैक्षणिक क्षेत्रात काम सुरू केले. उगवत्या पिढीला ख्रिश्चनांच्या प्रभावापासून वाचविणे हा या शाळांचा मुख्य उद्देश होता. त्यामुळे स्वाभाविकच येशू ख्रिस्ताची शिकवण असलेली पुस्तके या शाळांनी स्वीकारली नाहीत. त्याऐवजी सेंग खासी चळवळीचा इतिहास सांगणारी नवी क्रमिक पुस्तके चळवळीच्या नेत्यांनी लिहिली व तीच शिकविण्यात आली. इंग्रज सरकारच्या शिक्षणखात्याला हे रुचले नाही. त्यांनी शाळेची मान्यता काढून घेण्याची धमकी दिली व आर्थिक अनुदान देणे ताबडतोब बंद केले. पुढे खुद्द महात्मा गांधींनी या प्रश्नात लक्ष घालून ब्रिटिश सरकारला अनुदान सुरू करण्याची प्रकट विनंती केली; पण सरकारने तीही फेटाळून लावली!

अर्थात, अनुदान मिळाले नाही म्हणून काही सेंग खासी शैक्षणिक क्षेत्रातील कार्य थंडावले नाही. १९७३ मध्ये या कार्याचा व्याप वाढला आणि एक महाविद्यालयही उघडण्यात आले. शिलाँगच्या मध्यवस्तीत असलेल्या या महाविद्यालयाच्या तरुण प्राचार्या श्रीमती बत्तियाम तिमथाई यांची मुद्दाम भेट घेतली.

श्रीमती तिमथाई यांनी सेंग खासी चळवळीविषयी सविस्तरपणे तर सांगितलेच; पण खासी–बंगाली संघर्ष व ख्रिश्चनांच्या हालचालींबद्दलही त्यांनी मौलिक माहिती सांगितली. मेघालयातील ख्रिश्चनांच्या कामाचे एक सूत्रधार फादर स्नील यांच्यासह अनेक ख्रिश्चन मिशनरी खासींना बंगाल्यांविरुद्ध भडकवून देतात अशी माहिती श्रीमती तिमथाई यांनी दिली. श्रीमती तिमथाई यांनी आमदार मार्क्टिन माजा व पी. आर. किंडिया यांच्यावर टीका केली व ही मंडळी अटकेत होती तेव्हा मेघालयात शांतता नांदत होती, असंही सांगितलं. खासी व अन्य भारतीयात सुसंवादित्व स्थापण्याची गरज प्रतिपादून त्या म्हणाल्या की, आंतर–भारतासारख्या चळवळी या प्रदेशापर्यंत पोचण्याची आवश्यकता आहे. 'आपण भारतीय आहोत हे खासींच्या मनावर ठसत नाही तोपर्यंत ख्रिश्चन व पाश्चात्य संस्कृतीविषयीचे त्यांचे प्रेम कमी होणार नाही,'; हे त्यांचं मत विशेष चिंतनीय आहे.

खासी समाजजीवनाच्या इतिहासात सेंग खासी चळवळीला मोलाचं स्थान आहे. या चळवळीमुळे खासींचा वयंकार जागृत झाला, स्वाभिमान दुणावला आणि खऱ्या अर्थाने खासींना स्वत:ला assert करण्याची संधी मिळाली. वाढत्या ख्रिस्तीकरणाला एकीकडे पायबंद घालीत असतानाच खऱ्या अर्थानं खासींची धार्मिक व सांस्कृतिक वैशिष्टये जतन करून व त्याचबरोबर त्यांना मूळ भारतीय प्रवाहात आणण्याचे प्रयत्न करून सेंग खासी चळवळीने ऐतिहासिक कामगिरी बजावली आहे यात शंका नाही.


गेल्या ८० वर्षांच्या दीर्घ कालावधीत 'आपल्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेबाबत खासींना जागृत करण्याचे' ध्येय गाठण्यात सेंग खासी चळवळीने बरीच प्रगती केली आहे. विशेषत: मागासलेल्या खासींना ज्याची सहजगत्या भुरळ पडावी अशा पाश्चात्य संस्कृतीशी टक्कर देऊन आपल्या मूळ संस्कृतीबद्दल प्रेम वाटावे, अभिमान जागावा अशी परिस्थिती निर्माण करण्यात सेंग खासी चळवळीने महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. या सर्व कार्याची बैठक 'खासी हा हिंदूधर्माचा एक समांतर पंथ असून तो मूळ भारतीय सांस्कृतिक प्रवाहाचा घटक आहे' अशी होती व त्यामुळे या कार्याचं स्वरूप नेहमीच विधायक राहिलं.

खासी संगीत, खासी लोककथा खासी नृत्यप्रकार इत्यादींना ऊर्जितावस्था आणून खासी संस्कृतीच्या पुनरुज्जीवनासाठी सेंग खासी चळवळीने केलेले प्रयत्नही महत्त्वाचे आहेत. 'शाद सुक मिन्सिएम.' हा खासींचा नृत्योत्सव तर आता मेघालयातील राष्ट्रीय महोत्सव बनला आहे.

सेंग खासी चळवळीचे आतापर्यंतचे कार्य राजकारणातीत राहिले आहे ही एक उल्लेखनीय बाब आहे. मेघालयातील जवळजवळ सर्व पक्षांचे लहानमोठे कार्यकर्ते आज सेंग खासींशी संबंध ठेवू इच्छितात व निदान उघडपणे तरी कोणीही या चळवळीला विरोध करीत नाही ही सुद्धा या चळवळीच्या लोकमान्यतेची एक पावतीच म्हटली पाहिजे. या चळवळीचा तोंडवळा आज उघडपणे ख्रिश्चनविरोधी नाही हे खरे असले तरी ख्रिस्तीकरणाची अजस्र लाट थोपविण्यात अखेर याच चळवळीने ऐतिहासिक कामगिरी केली आहे, हे विसरून चालणार नाही. या चळवळीच्या प्रभावामुळेच आधी ख्रिश्चन झालेल्या अनेक खासींनी आपल्या मूळ धर्मात पुनर्प्रवेश केला आहे. अलीकडेच रामकृष्ण आश्रमाच्या प्रेरणेतून चेरापुंजी येथे एक पुनर्प्रवेश समारंभ झाला; त्यात सुमारे चाळीस खासी ख्रिस्ती धर्माचा त्याग करून आपल्या मूळ धर्मात परत आले. अर्थात ख्रिश्चन मिशनच्या विविध प्रलोभनांना आणि पाश्चात्य संस्कृतीच्या आधुनिक जीवन-पद्धतीला भुलून आज खासी तरुण सहजगत्या ख्रिश्चन बनत आहेत व हा लोंढा थोपविणे हे सेंग खासी चळवळीपुढे एक प्रचंड आव्हानच आहे. एक प्रकारे दोन संस्कृतींमधील हा संघर्ष आहे आणि सेंग खासी आपले सारे बळ पणाला लावून युद्धभूमीवर अविचल आहेत.

मेघालयातील वाढत्या ख्रिस्तीकरणाला तोंड देणाऱ्यांमध्ये सेंग खासी चळवळीबरोबरच रा. स्व. संघ, विश्व हिंदू परिषद, विवेकानंद केंद्र आणि रामकृष्ण मिशन इत्यादींचाही समावेश होतो. याच लेखमालेत पुढे या सर्व संघटनांच्या पूर्वांचलातील कार्याचा एकत्रित विचार करण्याचा मानस आहे. त्यामुळे इथे अधिक तपशिलात जात नाही.

मेघालयातील ख्रिश्चन–खासी व हिंदू–बंगाली यांच्यातील संघर्ष पूर्वांचलातील आव्हानाचा एक पैलू आहे. मेघालयातील सेंग खासी चळवळीप्रमाणे नागालँडमधील हाराका चळवळ ख्रिस्तीकरणाच्या विरोधात उभी राहून हे आव्हान पेलण्याचा प्रयत्न करीत आहे. भारताच्या या अतिपूर्वेकडील वादग्रस्त प्रदेशातील एकूण सर्वसाधारण परिस्थिती व राणी गायडींलो यांची 'हाराका' चळवळ यांच्याविषयी सविस्तर माहिती पुढील लेखांकात. (क्रमश:)



## सौंदर्यवादी झुंजार समीक्षक

# श्री. के. क्षी.

म. श्री. दीक्षित

मंगळवार दि. २९ एप्रिलला सकाळी श्रीकेक्षींच्या निधनाची वार्ता वाचून धक्का बसला! वार्ता अगदी अनपेक्षित होती. त्यांच्या गंभीर झालेल्या प्रकृतीची कुणालाच कल्पना नव्हती!

श्रीकेक्षींना गेली बत्तीस वर्षे मी जवळून पाहत आलो. अलीकडे काही वर्षे पुणे विद्यापीठातील क्वार्टर्समध्ये ते राहयला गेल्यापासून गाठभेट कमी होई; पण तत्पूर्वी शहरात ते तुकारामाश्रमात राहत होते तेव्हा गाठभेट जवळजवळ रोज होत असे. सभा-संमेलनप्रसंगी, साहित्य–परिषदेत किंवा त्यांच्या कोंदट खोलीत. गेल्या १५ जानेवारीला सायंकाळी आहिताग्नि राजवाडे मंदिरात, आहिताग्नींच्या आत्मचरित्रप्रकाशनसमारंभास ते सपत्नीक आले होते. वाढविलेल्या दाढीतील त्यांचा भेसूर चेहरा मी प्रथमच पाहत होतो. दाढी केव्हा वाढवलीत असं विचारलं तेव्हा क्षीण आवाजात म्हणाले, 'अलीकडेच. अहो, कंटाळा येतो रोज करण्याचा!'

आहिताग्नि राजवाडे हे श्रीकेक्षींचं एक दैवत होतं. अनेक वर्षं अप्रकाशित व उपेक्षित अवस्थेत पडून राहिलेलं आहिताग्नींचं लोकविलक्षण आत्मचरित्र प्रकाशित व्हावं अशी त्यांची फार इच्छा होती. त्यासाठी ते सतत यत्नशील होते. उशीरा का होईना, पण त्यांची ही इच्छा पुरी झाली आणि प्रकृतीच्या क्षीण अवस्थेत त्यांना प्रकाशनसोहळा पाहता आला! मला वाटते, श्रीकेंच्या बौद्धिक जीवनातील हा शेवटचा आनंदसोहळा! या प्रसंगानंतर त्यांची–माझी कधी भेट होऊ शकली नाही. त्यांना काही विशेष माहिती हवी असली की, मला ते साहित्यपरिषदेत फोन करीत व 'एकदा या इकडे' असं शेवटी म्हणत. श्री. वि. त्र्यं. शेटे यांचेसमवेत 'आज जाऊ, उद्या जाऊ' असे अनेकदा बेत केले; पण ते तसेच राहिले आणि मंगळवारी अचानक श्रीके गेल्याचं वाचलं!

श्रीकेक्षींची आजन्म अशक्त, रुग्ण वाटणारी प्रकृती लक्षात घेता, हा माणूस अन्नपाण्यावर कधीच वाढला नाही तर औषधं, वाचन, चिंतन आणि लेखन यांवरच जगत आला यात शंका नाही. शाळा–कॉलेजांतील अध्ययन-अध्यापन त्यांच्या बौद्धिक जीवनातील एक दुय्यम बाब होती. खरे तर हा दुबळ्या प्रकृतीचा, कृष्णवर्णी, ठेंगू माणूस जबर इच्छाशक्तीच्या बळावरच ७८–७९ वयापर्यंत जगला! त्यांना इतकी वर्षं आयुर्मान लाभलं त्याला आणखी एक माणूस कारण आहे. त्यांच्या द्वितीय पत्नी शकुंतलाबाई! शारीरिक आणि रंगरूपदृष्टचा स्त्रीला कसलंही आकर्षण वाटू नये असं श्रीकेक्षींचं बाह्यदर्शन होतं; पण २५ वर्षांनी मोठ्या असणाऱ्या या माणसावर शकुंतलाबाईंनी प्रेम करावं, लग्नाआधी दहा-पंधरा वर्षं प्रेमजीवन जगावं आणि नंतर लग्न करून या माणसाची सिंधूला लाजवील अशा निष्ठेनं सेवाशुश्रूषा करावी हे मला एक न उलगडणारं कोडं आहे! श्रीकेक्षींच्या अंगच्या गुणाढ्यतेचाच बहुधा हा पुरावा असेल! लग्न झाल्यावर प्रथमच श्रीकेक्षी साहित्यपरिषदेत आले तेव्हा मी जरा धिटाईने म्हणालो 'सर, तुमच्याशी विवाहबद्ध होण्यात शकुंतलाबाईंचा फार मोठा त्याग आहे असं मला वाटतं.' यावर ते लगेच म्हणाले, 'मला मान्य आहे, तुम्ही बरोबर बोललात!'

तरुण स्त्री आणि प्रौढ पुरुष यांच्यातील मैत्रीसंबंधी श्रीकेक्षींनी अनेकदा लिहिलं आहे. स्त्री-पुरुषसंबंध, विशेषतः मोकळी बौद्धिक मैत्री हा त्यांच्या लेखणीचा एक आवडता विषय होता. स्त्री-पुरुषांमधील बौद्धिक मैत्री ही शरीरनिरपेक्ष असू शकते हा त्यांचा सिद्धान्त मात्र मला कधीच पटला नाही. काही असो, श्रीकेक्षी या संबंधात जे लिहीत होते, बोलत होते, त्याप्रमाणे जगण्याचीही धडपड करीत होते. त्यांच्यासारख्या बुद्धिमान, स्वप्नाळू, काव्यप्रेमी माणसाला दैवयोगाने बौद्धिक सहचरी मिळत गेल्या आणि त्यांच्यापैकी दोघींबरोबर संसार करण्याचं त्यांना भाग्य लाभलं!

अतिशय तीव्र, सूक्ष्म, बुद्धिमत्ता लाभलेले श्रीकेक्षी वरवर पाहता बुद्धिवादी वाटत, पण अंतर्यामी दैववादी, नियती मानणारे, फलज्योतिषावर विश्वास ठेवणारे होते. कन्याराशीच्या श्रीकेंना मी एकदा कन्याराशीच्या प्रसिद्ध व्यक्तींची नामावली (त्यात मीही एक) ऐकवली तेव्हा ते फार खूष झाले. चिकित्सक बुद्धी आणि भावनोत्कटता या दोन्ही गुणांचं मिश्रण त्यांच्या ठायी होतं. कदाचित यामुळेच ते कौशल्याने वादविवाद करीत, वाद उकरून काढीत आणि ते अंगाशी आले की भावनाक्षोभाने अस्वस्थही होत. ते ना निखळ बुद्धिवादी होते, ना निखळ परंपराप्रिय होते. 'राक्षसविवाह' सारखी प्रदीर्घ भावकथा आणि इतर काही बऱ्यापैकी कथा सोडल्या तर त्यांच्या नावावर प्रतिभानिर्मित साहित्य अल्प आहे. जे आहे ते वाङ्मयसमीक्षात्मक आणि जीवनातील इतर अंगोपांगांबद्दल– भाष्यकारी पद्धतीचं.

सौंदर्यवादी झुंजार समीक्षक या तीन शब्दात श्रीकेक्षी यांच्या वाङ्मयीन मोठेपणाचं वर्णन करणं योग्य होईल. मराठी समीक्षेच्या आघाडीवर ते प्रायः एकाकी शिलेदाराप्रमाणे चिवटपणे लढत होते. गडकरी मास्तरांप्रमाणे सामान्य रूपाचे आणि अशक्त असूनही या वाङ्मयसेवकाने जन्मभर सौंदर्योपासना केली. केवळ वाङ्मय-कलेतीलच नव्हे, तर जीवनाच्या अनेक क्षेत्रांतील कुरूपतेविरुद्ध, विसंगतीविरुद्ध, ढोंगीपणाविरुद्ध त्यांनी आपली धारदार लेखणी चालविली. भाषाशुद्धी, अश्लीलता, नववाङ्मयातील दुर्बोधता इत्यादी विषयांवरील त्यांचं लेखन अतिशय गाजलं. त्या लेखनामुळं त्यांना जुन्या नव्या पिढीत अनेक शत्रू निर्माण झाले, थोडी अप्रियता स्वीकारावी लागली. अन्यांचा भडी-

भारही सोसावा लागला; पण त्यांनी याबाबतीतील आपली पक्की मते कधी सोडली नाहीत. लोकप्रियतेच्या मोहास ते बळी पडले नाहीत. चिंतन-वाचन-व्यासंग करून स्वतःच्या बुद्धीला जे पटलं–भावलं ते त्यांनी निर्भीडपणे, युक्तिवादपूर्वक सतत मांडलं.

फाजील आधुनिकता, ढोंगी पुरोगामीपणा हे श्रीकेक्षींच्या टीकेचं आणखी एक लक्ष होतं. त्यांच्या अशा टीकालेखनावरून एक गोष्ट स्पष्ट होई की, ते विशिष्ट भारतीय सांस्कृतिक मूल्यांचे अभिमानी होते. वाङ्‌मयक्षेत्रात गडकरी, तांबे, माधव जूलियन ही जशी त्यांची दैवतं होती; तशी वैचारिक क्षेत्रात ज्ञानकोशकार केतकर, विवेकानंद, आहिताग्नि राजवाडे, न्यायरत्न विनोद ही दैवतं होती. या दैवतांचं चिंतन–पूजन हा त्यांच्या लेखणीचा एक छंदच होता.श्रीकेक्षींचा पिंड आणि त्यांचा बौद्धिक विकास–विलास या दैवतांनीच घडविला होता. उर्दू–फारसीवर प्रेम करणाऱ्या आणि शायरीची मजा लुटणाऱ्या या माणसाने 'आपण हिंदु आहोत' याची कधीही लाज बाळगली नाही. पुरोगामी हिंदुत्वाचा ते सतत हिरीरीने कैवार घेत आले. शुद्ध मराठीचा कैवार घेणारे श्रीकेक्षी भाषाशुद्धीला विरोध करीत आले आणि स्वतःच्या लेखनात इंग्रजी प्रतिशब्द आणि शब्दसमुच्चय फॅशन म्हणून सतत वापरीत आले ही मोठी गंमत होती.

श्रीकेक्षींच्या समीक्षालेखनाचं मला नेहमीच आकर्षण वाटत आलं ते दोनतीन वैशिष्टयांमुळं. एक–मूलभूत विचार करून काही तरी नवीन मतं ते युक्तिवादपूर्वक मांडीत. त्यांची मतं सर्वांना पटतील अशी नसली तरी विचारांना चालना देणारी आणि काही तरी नवी दृष्टी देणारी खास असत. नवयुग, लोकसत्ता, केसरी, तरुणभारत इत्यादी पत्रांतून त्यांनी अनेक वर्षे जे स्तंभलेखन केलं ते यादृष्टीनं फार मोलाचं, वाचनीय असे. या लेखनात त्यांच्या बहुश्रुततेचा, रसिकतेचा, कुशाग्र बुद्धीचा आणि वादकौशल्याचा चांगला प्रत्यय येई. दुसरं याहून महत्त्वाचं वैशिष्टय असं की, श्रीकेक्षींचं टीकालेखन सर्वसामान्य वाचकाच्या दृष्टीने सुगम, नेटकं, चटकदार व रसोद्ग्राही पद्धतीचं असे. किंबहुना त्यांच्या टीकालेखनाची एकूण धाटणीच ललितलेखनाच्या वळणाची होती. याबाबतीत केळकर, कोल्हटकर, फडके, माडखोलकर आणि कुरुंदकर यांच्याशी त्यांची तुलना करता येण्यासारखी आहे. श्रीकेक्षी हे विचार आणि अभिव्यक्ती सुगमपणे आणि लालित्याच्या ढंगाने व्यक्त करण्याची हातोटी लाभलेले थोर भाष्यकारी समीक्षक होते यात शंका नाही! त्यांचे अनेक टीकासंग्रह,विशेषतः 'टीकाविवेक' हा ग्रंथ मला या दृष्टीने फार मोलाचा वाटतो. तिसरं मला भावलेलं वैशिष्टय म्हणजे त्यांच्या समीक्षेची विस्तृत कक्षा. म्हणजेच जीवनाच्या नानाविध अंगोपांगासंबंधीचं त्यांचं मुक्त चिंतनात्मक लेखन. निखळ कलावादी असूनही हा माणूस सामाजिक जिव्हाळ्याच्या अनेक विषयांवर धारदार लेखन करून आपल्या भल्याबुऱ्या प्रतिक्रिया व्यक्त करीत होता. त्या व्यक्त करताना कधीकधी अहंकार, चीड, इतरांविषयी तुच्छता दिसून येई. प्रत्यक्षात ते कधीकधी हमरीतुमरीवरही येत, तर कधीमधी अकारण वाद उकरून काढून प्रसिद्धीच्या मोहचक्रात अडकवून घेत. पण हे सारं कधीमधी घडे. त्यांचा आक्रमक पवित्रा हा तात्कालिक असे. एकूण प्रवृत्ती सुजन संरक्षकाची, झालं गेलं विसरून जाण्याची आणि सुखसंवादात रमण्याचीच होती असा माझा अनुभव आहे.

श्रीकेक्षींच्या बौद्धिक साहचर्याचा मी मनापासून भोक्ता होतो. साहित्यपरिषद आणि संमेलने या दोन संदर्भात त्यांनी आपल्या 'तसबीर–तकदीर' मध्ये जे आत्मगौरवात्मक अप्रमाण लिहिलं ते मला रुचलं नव्हतं. 'माणूस' मध्ये मी त्यांच्या तसबिरीस थोडे ओरखड काढले तेव्हा त्यांचं मला एक महत्त्वाचं पण आपली भूमिका सांगणारं पत्र आलं होतं. आत्मगौरवात रमण्यात त्यांना एक प्रकारचा आनंद वाटत असे. गृहस्थी, स्वप्नाळू आणि बुद्धिजीवी ही श्रीकेक्षींची तीन रूपे होती आणि ती तिन्ही त्यांच्यातील रसिल्या समीक्षकात सामावून गेलेली होती. फेसाळ किंवा अवघड, दुर्बोध लिहिणाऱ्या समीक्षकांपेक्षा श्रीकेक्षींसारखा स्वतःचो मत असणारा आणि ती निर्भीडपणे मांडणारा समीक्षक मला नेहमीच आदरणीय वाटत आला आहे. ◻

## पुस्तक ओळख

# The Immortals

**Best Selling Novel In France**

**माधुरी बापट**

'The Immortals'–पुस्तकाचं नाव नि कव्हर पाहिलं नि काही तरी छान खास वाचायला मिळालं म्हणून मनस्वी आनंद झाला. त्या कव्हरवर Best Selling Novel in France असं वाचून उत्सुकता आणखीनच वाढली. कारण त्याने डॅफ्न दि मॉरिए च्या 'रेबेका' ची आठवण करून दिली; पण पुस्तकाचं मलपृष्ठ पाहिलं नि लेखकाविषयी 'One of the pioneers of science fiction in France' असं वाचलं तेव्हा थोडी निराशाच झाली.

कारण 'सायन्स फिक्शन' एकूणच 'फिक्शनसाहित्य' म्हणलं की ते वाचण्याची मला इच्छाच होत नाही. विशेषतः अमेरिकेत आल्यापासून UFO, Buck Rogers in 25th century सारख्या टेलिव्हिजनसेरीज पाहून मन विटलं होतं.

परंतु आतील बाजूस पुस्तकाचा सारांश वाचला– तेव्हा विशेषतः केनेडी, जॉन्सन, निक्सन ह्या शब्दांनी माझी उत्सुकता वाढली १९५५ ते १९७२ मधील महत्त्वाच्या जागतिक घटनांच्या पार्श्वभूमीवर, एक फ्रेंच शास्त्रज्ञ व त्याची त्याच्याहून वयाने मोठी असलेली प्रेयसी यांची अपूर्व प्रेमकहाणी, हा पुस्तकाचा-कादंबरीचा विषय.

कादंबरीचं पहिलंच वाक्य वाचलं नि आश्चर्याचा धक्काच बसला. '१७ जाने. १९५५– बिहार दुष्काळावर पंडित नेहरूंनी दिल्लीमध्ये खास कॅबिनेट मीटिंग बोलावली होती'– ह्या वाक्याने–विशेषतः पंडित नेहरू ह्या शब्दाने उत्सुकता चांगलीच ताणली.

एवढी महत्त्वाची मीटिंग सोडून नेहरू केवळ एक टेलिफोन आला म्हणून तातडीने विमानाने मुंबईस रवाना होतात. त्याचं कारण दिल्लीमध्ये कुणालाच कळलं नाही! पण ती घटना होतीच तशी अपूर्व! एका

भारतीय ऋषिसमान शास्त्रज्ञाने आपल्या आश्रमासारख्या वाटणाऱ्या प्रयोगशाळेमध्ये अमृतासारखे द्रव्य शोधून काढले होते. ते घेतल्याने केवळ मनुष्यप्राणीच नव्हे तर सर्व सजीव सृष्टीच अमर होणार होती. ही गोष्ट कळल्यावर नेहरूंनी तातडीने मॉस्को व वॉशिंग्टन–दोन्ही ठिकाणी Hot line लावली नि तो दिव्य शोध जगातील दोन सुपर पॉवर्सच्या नेत्यांना सांगितला.

त्या घटनेनंतर बरेच वर्षं जगातून वेगवेगळया देशांतले नं. १ चे शास्त्रज्ञ, डॉक्टर्स, इंजिनियर्स हळूहळू बेपत्ता झाले ! त्यामध्ये फ्रान्समधील तरुण शास्त्रज्ञ रोलंड याचाही समावेश असतो. ह्या दुःखाने वेडी न होता त्याची प्रेयसी जिनी त्याच्या शोधासाठी सर्व आयुष्य वेचते. तो मृत नाही याची तिला खात्री असते.

त्यासाठी भारत वगैरे देशांतून जगभर प्रवास करते व शेवटी अमेरिकेत येते तेव्हा अध्यक्ष निक्सन सत्तारूढ असतात तिची तपश्चर्या फळाला येते व एक दिवस तिला तिचा प्रियकर भेटतो– तिला एका नव्या जगाचा शोध लागतो.

J L 3 च्या शोधानंतर जगातल्या सर्व महत्त्वाच्या देशांचे नेते एकत्र येतात व ते गुपित फक्त त्यांच्यातच ठेवतात.सर्वांनी मिळून पॅसिफिक महासागरात एका बेटावर एक अपूर्व असं जग निर्माण केलेलं असतं. तिथे जगातली केवळ नं. १ चीच माणसं जगत असतात. कुठेही रोगराई नसते, कुणावरही कसलंही बंधन नसते, कोणीही म्हातारं होत नाही, भारतीय ऋषीसमान शास्त्रज्ञापासून ते शास्त्रज्ञांच्या नोकराणीपर्यंत सर्व समानतेने जगत असतात. लहान मुलांना शिकण्याचे बंधन नसते. वाटलं तर नुसतंच खावं, प्यावं, हुंदडावं, झोपावं ! वाटलं तर अभ्यास करावा. त्यामुळे वाचता न येणारी पंचविशीतली मुलं असतात, त्याचबरोबर गणित, भौतिकशास्त्रात दिव्य शोध लावणारी १४–१५ वर्षांची मुलेही असतात.

ह्या मुक्त जगामध्ये मुलामुलींनी १३ व्या वर्षापासूनच लैंगिक जीवन अनुभवलेलं असतं. त्याचा खरा अर्थ कुणालाच कळलेला नसतो. कारण : 'पुनरुत्पादन' ही गोष्टच त्या जगांत नसते. जन्म नि मरण ह्या दोन्ही नैसर्गिक गोष्टींवर मानवानं बेमालूम विजय मिळवलेला असतो.

ह्या जगात कादंबरीची नायिका मात्र तांदळातल्या खड्यासारखीच असते. ती ह्या कृत्रिम नैसर्गिक जीवनाशी एकरूपच होऊ शकत नाही. कारण तिने J L 3 घेईपर्यंत तिची पन्नाशी उलटलेली असते व तिचा प्रियकर मात्र तिशीतच असतो.या धक्क्यातून ती सावरू शकत नाही.

आणि एक दिवस अघटित घडते. तो भारतीय ऋषी उपास करतो. त्याच्याबरोबर एक तरुणीही उपास करते. दोन दिवस अन्न न घेतल्याने, अन्नातून रोज मुलींना दिले जाणारे Birth control चे औषध तिला मिळत नाही व एका मित्रापासून ती गरोदर राहाते. तिचे गुपित व त्याविषयीचे ज्ञान सर्व मुलामुलींना जीनीकडून कळते व जीवनाचा खरा अर्थ इथे त्यांना कळतो. अशाच आणखी एका उपासाच्या वेळी सर्व मुली अन्न न घेता गरोदर होतात व त्या जगात मोठीच खळबळ माजते. सर्व प्रौढ शास्त्रज्ञ एकूणएक मुलींचे ॲबॉर्शन करण्याचा प्लॅन आखतात.त्याला जीनीचा अर्थातच विरोध असतो.

आई-बाप होऊ इच्छिणारी सर्व मुलेमुली ह्या विरुद्ध रिव्होल्यूशन करतात. हा शब्दही ह्या वेळेपर्यन्त त्यांना ठाऊक नसतो. शेवटी क्रायसेस हाताबाहेर जातो व पुन्हा जगातील सर्व नेते एकत्र येतात व त्या जगाचा नाश करतात.

अशी ही थोडक्यात म्हटली तरी बरीच लांब कथा ! भाषांतरित असल्याने मूळ फ्रेंचमधील गंमत उतरली आहे असं वाटत नाही. थोडा वेळ फ्रेंच येत नसल्याचे वाईट वाटले.

कल्पनेची भरारी सर्वच फिक्शन साहित्यात असते; परंतु कादंबरी वाचून पूर्ण झाल्यावर दोन–तीन गोष्टी मनावर परिणाम करून गेल्या, त्या सांगितल्यावाचून राहवत नाही.

जर्मन कवी गटे शाकुंतल डोक्यावर घेऊन नाचला होता हे आपण ऐकतो. जगामध्ये मॅग्नेटिक वाटणाऱ्या व्यक्तिमत्त्वात नेहरूंचा समावेश आहे, तसंच फ्रान्समध्ये Best selling Novel ही त्यांच्या कर्तबगारीवर व भारतीय शास्त्रज्ञाच्या अपूर्व शोधाच्या कल्पनेवर लिहिलेली असावी ही गोष्ट तेवढीच थ्रिलिंग वाटते.

सध्या चालू असलेल्या सुपरपॉवर्समधील cold war प्रमाणे वरचेवर तशी शीतयुद्धे चालू असतातच. पूर्वी एकदा तशा शीतयुद्धाचा अंत करायची कामगिरी नेहरूंनी केली. जगातल्या दोन मोठ्या शक्तींवर सारखाच Influence असणारा एकच देश-तो-म्हणजे भारत ! सध्याच्या शीतयुद्धात 'Russian Troops must get out of Afganistan' तडफेनं सांगणारी नेहरूपुत्री तेच काम करत आहे का ? असं वाटल्यावाचून राहात नाही.

आणखी म्हणजे सध्या जगातला नं.१ चा देश, नं. १ चा समाज म्हणून अमेरिकेकडे पाहिले जाते. कादंबरीमधील तो समाज म्हणजे अमेरिकेतल्या मुक्त समाज–जीवनाची अगदी Ideal स्थिती म्हणावी लागेल. शेवटी त्या समाजाचा, जगाचा नाशच होतो.

सध्या एका टोकास पोचलेला अमेरिकन समाज,मुक्त जग ह्याचाही असाच शेवट आहे का? असा विचार मनात आल्यावाचून राहात नाही. □

मूळ लेखक : Rene Barjavel
इंग्रजी भाषांतर : Eilean Finletter.
प्रकाशक: William Morrow & Co. Inc
105, Madison Av, N.y. N. Y. 10016.
किंमत : $ 6.95


व्हान गॉग

'लस्ट फॉर लाइफ' या आयर्व्हिंग स्टोनच्या जगप्रसिद्ध कलाकृतीचा मराठी अनुवाद

अनुवादिका
माधुरी पुरंदरे
प्रकाशक
प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे

# सुशिक्षित बेकाम

आपल्यां देशापुढील
एक प्रचंड प्रश्न



देशातील कल्पक आणि जिद्दी तरुणांना
महाबँक व्यवसाय मार्गदर्शन आणि अर्थसहाय्य करते.
अधिक माहितीसाठी आपल्या नजिकच्या
आमच्या शाखेस आजच भेट द्या.

बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)

मुख्य कचेरी: लोकमंगल १५०१ शिवाजीनगर पुणे - ४११ ००५

बँकिंग सेवा
व्यक्तिगत जिव्हाळा

NAVADKAR.

SKY/F/8004

## संध्याकाळचे पुणे

पृष्ठ ३ वरून

वसंतऋतूचा कामाशीच नाही तर आम्हाशी संबंध लावला आहे. आमच्या पाठ्यपुस्तकात असा श्लोक होता,

वसंतसमयी फुले परिमळे दिशा व्यापिजो ।।
जयास अवलोकुनी सुरतरूहि चित्ती थिजो ।।

जोपर्यंत चैत्रवैशाख वसंतऋतू हे डोक्यात होते तोपर्यंतच वसंतऋतूची अशी काव्यमय वर्णने होत होती. ते डोक्यातून जाताच वसंतऋतु येत राहिला तरी वसंतऋतूला आपण हरवलो.

वर्षातील पहिली कोकिळा एका पहाटे पहिले कुहुकुहु करते आणि अंगावर वासंतिक रोमांच उठवून जाग आणते. अजून पुण्याच्या काही भागात हा अनुभव घेता येतो. कोकिळा ओरडू लागली की आम्ही जसे चिडवीत होतो तशी आताची मुलेही कुहुकुहु ओरडून तिला चिडवीत असतात. कोकिळा शोधीत आम्ही झाडांकडे धावत असू तशी तीही धावत असतात. पानांच्या दाटीत कोकिळा अशी काही दडलेली असते की ती सापडतच नाही. खूप शोधून ती कुठच्या फांदीवर आहे हे कळेपर्यंत ती उडून दुसऱ्या झाडात शिरते. कोकिळा कुहु ओरडली की आपण कुहु ओरडायचं, दरवेळेला जास्त जास्त भरभर ओरडत राहिलं की तीही चिडून तशी ओरडते आणि आपण फसलो हे कळताच एकदम गप्प होते.

◘

कोकिळेमागे लागण्याचा हा खेळ सनातन आहे. श्रीरामानं, श्रीकृष्णानं, कौरवपांडवांनी हाच खेळ केला. मला यात संशय वाटत नाही. आम्ही कुहु ओरडलो तसे कौरवपांडवही ओरडले, आम्ही विटीदांडू खेळलो, तसे कौरवपांडवही उन्हाळयाच्या सुट्टीत किंवा वसंतऋतूत विटीदांडू खेळत होते. त्यांची विटी विहिरीत पडली व द्रोणाचार्य तिथे आले, या कथेवरून हे सिद्ध होते. सहज विचार मनात आला तो सांगतो. विटी पडण्याच्या आधी तासभर किंवा नंतर तासाभराने द्रोणाचार्य त्या विहिरीवर आले असते तर महाभारताची कथा वेगळीच झाली असती. यावर विचार व्हावा. कारण तासाआधी द्रोणाचार्य विहिरीशी येऊन पोहोचले असते तर विटी पडलेली नसती व नंतर तासाने पोहोचले असते तर तोपर्यंत विटी हरवली असा निर्णय घेऊन कौरवपांडव घरी परतलेले असते. एकूण ते कौरवपांडवांचे गुरु झाले नसते व पुढचे सगळे घोटाळे टळले असते !

उन्हाळचात माळरानावर विटीदांडू खेळताखेळता आम्हीही आमची विटी खबदाडात हरवून बसत असू. मला एवढंच कोडं आहे की विहिरीत विटी पडली तर एवढा गहजब होण्याचं कारण काय ? काही क्षणात कौरवपांडवांना दुसरी विटी छिलून खेळ सुरू करता आला असता. एक तर त्या वेळी कोयते नसावेत किंवा त्या महाकवीला द्रोणाचर्यांना कौरवपांडवांचे गुरु करण्यास हा एक कलापूर्ण धागा मिळाला असावा !

अजूनही आमचा माळरानावरचा वसंतऋतूतला (उन्हाळचातला) विटीदांडू आठवला की मन आनंदाने शहारून येते. किंबहुना उन्हाळयाच्या सुट्टीत जे जे आम्ही केलं ते ते आठवून हर्षाचे शहारे येतात. एवढेच काय पण कोवळचा पानांतून गार होत वारा वाहू लागला की शहारून येते. करवंदीच्या जाळीत शिरून आम्ही जी करवंदे खाल्ली त्यांचे वजन पुण्याच्या मंडईत एका सीझनला येणाऱ्या करवंदांइतके नक्की असेल ! त्या काही वर्षात दगडाने पाडून किंवा वर चढून जे आंबे काढले व कचाकच खाल्ले त्यांची संख्या सदाशिव-नारायण या पेठांना वर्षाचे जेवढया आंब्यांचे लोणचे लागते तेवढी असेल! त्या वेळी जांभळांचे घडच्या घड खुडून आम्ही खाल्ले त्या जांभळांची संख्या रामाच्या शेंडीपासून सीतेच्या पायांपर्यंत होईल! याच दिवसांत एकदा आमची पंचक्रोशी पावसाने झोडपली. दुसरे दिवशी आम्ही काही कामासाठी बैलगाडीतून गेलो तेव्हा आमची बैलगाडी अक्षरशः वादळात पडलेल्या आंब्यांच्या पायघडया करून गेली!

आता हे वासंतिक आंबे बहुतेक गावांतून नाहीसे झाले. आंबे गेले, मोर गेले, आपले सखेसोबती गेलेले पाहून वसंतही जाऊ लागला आहे. आंबे नाहीसे होण्याचे कारण एकाने सांगितले, आंब्यांची नवी झाडेच उगवत नाहीत! कारण गावोगावचे आंबे लॉऱ्या भरभरून घेवारी मुंबईस नेतात. त्या आंब्यांचे बाठे पूर्वी गावातच पडत व पावसाळचांत आंब्यांची अनेक रोपटी उगवत. त्यातली दहा टक्के जगली तरी आंबे कमी होत नसत. आता आंब्यांच्या कोई मुंबईत कचरापेटीत जातात !

तरीही खेडोपाडयांतून अजूनही वसंतऋतूची शोभा दिसते. शहरातला वसंत मात्र कुरूप झाला आहे. मी जे देखावे सांगणार आहे ते अतिपरिचयामुळे आपल्या लक्षात आले नसतील. लठ्ठ पोटांचे व हडकुळया वाकडया पायांचे किंवा शरीराचा सापळा झालेले व बाक आलेल्या पायांचे किंवा केस व शिरा यांनी भरलेल्या पायांचे नागरिक पट्टयांची अर्धी चड्डी व वर गंजीफ्राक घालून हिंडतात तो देखावा कुरूपच. म्हातारे-म्हाताऱ्या घरात जागा नसल्याने भर गर्दीच्या रस्त्याच्या काठी कुठे बँकांच्या पायऱ्यांवर, कुठे पोस्टांच्या कट्टयावर, कुठे कॉलेजच्या कुसांवर बसलेले दिसतात तो काय सुंदर देखावा ? वसंतऋतूतील संध्याकाळ घालविण्याची ही काय ठिकाणे झाली ?

आता वसंतऋतूत सर्व पुणे घराबाहेर पडलेले वाटेल. रसाची दुकाने गिऱ्हाइकांनी भरगच्च दिसतील आणि 'अमृत' तुल्य चहाची दुकाने मोकळी दिसतील. फळांच्या रसाच्या गाडयांभोवती लोकांचे कडे दिसेल. आइस्क्रीमची दुकाने वजन वाढलेल्या स्त्रिया, त्यांची गुटगुटीत मुले व किडकिडीत

यवरे यांनी गजबजलेली असतील. बर्फाचे रंगीत गोळे विकणाऱ्या हातगाड्यांच्या घंटा बोळाबोळांतून निनादताना ऐकू येतील. थंड पेयांच्या दुकानांतून नव्या नव्या निघालेल्या आकर्षक नावांच्या व अफलातून किमतीच्या बाटल्या घाम येईपर्यंत फुटत राहतील. दुकानदारांनी ठिकठिकाणी रस्त्यावर मारलेल्या पाण्यामुळे मातीचा सुगंध दरवळलेला असेल! (पुण्यांतील पाणी शिंपणाऱ्या गाड्या का बंद केल्या यासाठी चौकशीकमिशन नेमले पाहिजे !)

पूर्वी पुण्यांत दोन तऱ्हेच्या कोकिळा ओरडत. एक झाडावरची व दुसरी खाली दुकानातील सोडालेमनच्या बाटल्यांतील ! त्या वेळी ही म्हणजे सोडा व लेमन–दोनच पेये लोकप्रिय होती. या सोडा किंवा लेमनच्या बाटल्या गॅसदाबात भरून ठेवलेल्या असत. बाटलीच्या गळ्याशी एक काचेची गोटी असे व ती गॅसच्या दाबाने बाटलीच्या तोंडात घट्ट बसे. गॅस बाहेर येऊ देत नसे. बाटली फोडताना दुकानदार लाकडाचे टोपण घेऊन बाटलीच्या तोंडावर दाबी. तेव्हा तोंडापाशी बसलेली गोळी खाली जाऊन गॅस बाहेर येई व येताना तो कुई कुई करीत किंचाळत येई! कोकिळेचा व या बाटल्यांचा आवाज आले नाहीत तर चुकल्यासारखे होई. उन्हाळा नाही असे वाटे!

त्या बाटल्या गेल्या, रस्त्यावर पाणी शिंपडणे गेले, झाडे कमी झाली, लोकसंख्या वाढली, पुण्यातला उन्हाळा वाढतोच आहे. आज सकाळपासून गदगदत आहे. बाहेरून आलेले 'काय तुमची पुण्याची हवा! मुंबईच बरी !' म्हणून खिजवीत आहेत. संध्याकाळ उतरत आहे; पण त्याहूनही एकदम अंधेरून आले आहे, एक वीज चमकून गेली व थोड्याच वेळांत कडाड्कड गर्जना झाली. वसंतऋतूची हीच गम्मत आहे. एकीकडे कोकिळेचा मधुर आलाप तर दुसरीकडे थरकाप उडवणाऱ्या मेघगर्जना !

एकाएकी थेंब पडू लागले मोठमोठाले! मातीचा तिखट सुगंध नाकात दरवळला. पहाता पहाता थेंब मोठा झाला, पांढरा झाला, पत्र्यावरून, छपरावरून गारांचा आवाज येऊ लागला. चहुकडून 'गारा–गारा' ओरडा झाला, स्त्री–पुरुष–मुले गारा वेचावयास धावली. अंगण गारांनी पांढरे होऊ लागले. सर्व भिजत होते, गारांचा मार खात होते पण गारा गोळा करीत होते ! गारा अंगणातून उशा घेऊन घरांत टपकू लागल्या. एक माझ्या मांडीवरच टपकली ! हीच वसंतऋतूची फलश्रुति !

□

# मा. दीनानाथांचे पुण्यस्मरण

## पुण्यातील सोहळा

मराठी संगीत रंगभूमी या मातीत रुजली, वाढली, पसरली; यामागे या रंगभूमीवरील मोठमोठ्या गायक कलाकारांची संपन्नता उभी आहे. बालगंधर्व, मा. दीनानाथ, केशवराव भोसले हे या रंगभूमीचे एका अर्थाने पाईकच ! बालगंधर्वांचे देखणेपण, स्वर्गीय आवाज यामुळे त्यांचं गाणं लोकांमध्ये जास्त प्रिय झालं; पण मा. दीनानाथांच्या वाट्याला ही प्रियता मोजकीच आली. दीनानाथांचं गाणं रंगभूमीवरील त्या वेळच्या संगीतापेक्षा आगळं आणि वेगळं होतं. त्यांच्या सुरातील तडफ, चापल्य, गाण्यातला आत्मविश्वास याने जाणकारांमध्ये धक्का दिला होता. हे गाणं तेजस्वी होतं, आपलं स्वतःचं अस्तित्व दाखवणारं होतं. दीनानाथांजवळ असे गुण असूनही त्यांना बालगंधर्वांइतकी लोकप्रियता आणि जनमान्यता मिळू शकली नाही.

गेली ३८ वर्षे दीनानाथांचे कुटुंब त्यांची पुण्यतिथी साजरी करीत आहे. या वर्षी प्रथमच पुण्यतिथीचा कार्यक्रम पुण्यात झाला. पुणेकर नाटकाचे विशेषतः संगीत नाटकाचे रसिक आहेत. पुण्याला प्रेक्षकांची परंपरा आहे आणि हे लक्षात घेऊनच मा. दीनानाथांची पुण्यतिथी पुण्यात साजरी झाली.

दीनानाथांचा वारसा जगभर नेऊन सोडणारी त्यांची कन्या लता, आशा, मीना, हृदयनाथ, उषा आणि माई मंगेशकर या सर्वांनी मिळून हा कार्यक्रम साजरा केला. माई तर तिन्ही दिवस उपस्थित होत्या! या निमित्त संगीत भावबंधन, संगीत स्वयंवर, संगीत मृच्छकटिक अशी तीन नाटके आयोजित करण्यात आली होतीं. संगीत रंगभूमीच्या शताब्दि वर्षानिमित्त आणि मा. दीनानाथ हे संगीत रंगभूमीवरील कलाकार म्हणून या नाटकांच्या आयोजनात औचित्य होतं.

टिळक स्मारक मंदिराच्या खालच्या मोकळ्या जागेत मा. दीनानाथांचं भव्य तैलचित्र लावण्यात आलं होतं. त्याशिवाय दीनानाथांचे दुर्मिळ फोटोही ठिकठिकाणी लावण्यात आले होते.

पहिल्या दिवशी म्हणजे दि. २४ रोजी लताबाईंच्या उपस्थितीत पुण्यतिथीनिमित्तचा कार्यक्रम पार पडला. लताबाईंची उपस्थिती पुणेकरांच्या दृष्टीने अपूर्वच !

आपल्या पिताजींच्या पुण्यतिथीला उपस्थित राहून भाषण करताना लताबाई म्हणाल्या "
"माझ्या वडिलांची पुण्यतिथी म्हणजे माझ्यासाठी एक फार विचित्र अनुभव असतो. ज्या वेळी माझ्या वडिलांच्या म्हणजे एका महान कलाकाराच्या पुण्यस्मरणासाठी हजारो रसिक प्रेक्षक आणि कलावंत भाग घेत असतात त्या वेळी मी मात्र माझे बाबा मला याच दिवशी सोडून गेले या आठवणीने आतून रडूरडू झालेली असते. माझे बाबा मला पोरके करून गेले असे नाही, तर आम्हाला सोडून जाताना तेच स्वत: पोरके होऊन गेले. मी ज्या वेळी कुठल्या तरी रंगमंचावर गायला, बोलायला किंवा सत्कार स्वीकारायला उभी राहाते त्या वेळी कुणीतरी माझ्या सभोवार व्यापून राहिले आहे याची मला जाणीव होते. आजही इथे बाबांचा आत्मा कुठल्या तरी कोपऱ्यातून माझ्याकडे कौतुकाने पाहात असेल ! " एका महान कलावंताची आपल्या पिताजींना ही सहृदय श्रद्धांजली होती.

समारंभाचे अध्यक्ष डॉ. वसंतराव देशपांडे दीनानाथांचे शिष्य ! दीनानाथांचे गाणे ऐकूनच आपण संगीताकडे वळलो असे सांगून ते म्हणाले, "दीनानाथांनी मराठी रंगभूमीला नवे वळण लावले, एवढेच नव्हे तर त्यांनी रूढ रंगभूमीला धक्का देऊन आणलेल्या अभिनव कल्पना क्रांतिकारक होत्या. त्यांचा गळा विलक्षण होता. तरल होता तितकाच वजनदारही होता. पुढे कित्येक शतकात असा गळा होणार नाही असे उद्गार मा. दीनानाथांच्या गुरूंनीच, वझेबुवांनी काढले होते. वसंतरावांनी दीनानाथांच्या गाण्याबद्दल थोडक्यात आपली मते मांडली. दीनानाथांच्या गायकीचा वारसा वसंतराव सध्या चालवताहेत. तो जपला पाहिजे यात शंका नाही.

या समारंभात दीनानाथांबरोबर भूमिका केलेल्या, त्यांच्या बलवंत संगीत मंडळीत असलेल्या कलावंतांचा सत्कार लताबाईंच्या हस्ते करण्यात आला. श्री. बाबासाहेब पुरंदरे यांनी या वेळी या कलावंतांचा मोजक्या शब्दात नेटका परिचय करून दिला. श्री. गणपतराव मोहिते ऊर्फ मा. अविनाश, बाळकोबा गोखले, परशुराम सामंत, श्रीपाद जोशी, चंद्रकांत गोखले, नारायण ऊर्फ बाबी बोरकर, चित्तरंजन कोल्हटकर, दादासाहेब जेस्ते, सुरेश हळदणकर. या कलावंतांचा सत्कार करण्यात आला.

या पुण्यतिथीमुळे दीनानाथांच्या गायकीची आठवण पुनश्च जागी झाली. दीनानाथांची नाटचगीते कान आठवू लागले. दीनानाथांच्या आज उपलब्ध असलेल्या ध्वनिमुद्रिकेवरून त्यांच्या गाण्याचा एकूण अंदाज बांधणे शक्य नाही; पण त्यांच्या गायकीतला देखणेपणा मात्र त्यातून प्रत्ययाला येतो. दीनानाथांचं गाणं म्हणजे बिजलीचा चमचमाट असतो पण त्याचबरोबर त्या गाण्यात चांदण्याची शीतलताही असते. 'शांत दांत चारुताही' सारख्या गाण्यातून यांचा प्रत्यय येतो.

दीनानाथांच्या गाण्यात दिसणारी स्वत:ची पखरण, त्यातली सर्जनशीलता, स्वरांचं माधुर्य, तानेचा कस यामुळे त्यांच्या गाण्यात एक स्वतंत्र अस्मिता दिसून येते.

'प्रेमसेवा शरण 'सारख्या गीतातून किंवा 'परवशता पाश दैवे 'सारख्या गीतातली आवहकता रसिकांना मंत्रमुग्ध करते. त्यांच्या तानेतील, मींडेतील निनादी स्वर ते ज्या सहजतेने आणि कलात्मकतेने योजतात त्यामुळे आमच्यासारखेही अभावितपणे चमकून अहाहा ! म्हणतात. सुरेल गळा, लयीची उपजत जाण, सर्जनशीलता, आक्रमकता, गाण्यातला पुरुषार्थ, चमचमाट या सर्वांमुळे दीनानाथांचे वेगळेपण लक्षात राहते.

नाटचसंगीतामध्ये दीनानाथांनी स्वत: स्वररचना केलेली गीते एक स्वतंत्र स्थान मिळवून आहेत. आज त्यांच्या उपलब्ध असलेल्या ध्वनिमुद्रिकांतून त्यांच्या या गुणांची जाणीव होते आणि आपण मुग्ध होतो.

दीनानाथांचं पुण्यस्मरण म्हणजे दीनानाथांचं गाणं जपणं. ते सोन्यासारखं गाणं आता जपून ठेवलं पाहिजे. संगीत रंगभूमीच्या इतिहासात एका सोनेरी पानावर लिहिल्या गेलेल्या या गायकाच्या गायकीला आता आपण वाढवलं पाहिजे. दीनानाथांनी आयुष्यभर खूप हाल सोसले. मानसिक स्थैर्य त्यांना कधी लाभलंच नाही; पण त्यांनी ज्या नेटानं आणि निष्ठेनं संगीत रंगभूमीची सेवा केली त्याला तोड नाही. बालगंधर्वांसारखे ऐश्वर्य नसतानाही प्रतिकूल काळात दीनानाथांनी आपली सेवा रुजू करून रसिकांवर फार मोठे उपकार केले आहेत.

दीनानाथांचे पुण्यस्मरण आता यापुढील शिष्यांना व्हावं यासाठी अशा कार्यक्रमांची गरज आहे. हा पुण्यतिथिमहोत्सव अधिक मोठ्या प्रमाणावर व्हायला हवा. त्याचप्रमाणे दीनानाथांच्या गायकीचे वैशिष्टय, त्यांच्या गाण्यातील सौंदर्य संगीतरसिकांना समजावून सांगता यावे यासाठी एखादा कार्यक्रम आयोजिल्यास अधिक बरे !

दीनानाथांच्या पुण्यस्मरणाला आम्हा संगीत रसिकांचं अभिवादन !

□


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# चित्रपट

सदानंद बोरसे

## सबूत

### वेताळपंचविशी : कथा पाचवी

इतके होऊनही रामसे कुटुंबाने हट्ट सोडला नाही. त्यांनी नवे प्रेत खांद्यावरच्या तिरडीवर टाकले आणि ते स्मशानाची वाट चालू लागले. थोड्या वेळानेच त्यांनी आपल्या आधीच्या चित्रपटांमध्ये बऱ्याच वेळा वापरलेल्या भयंकर चेहऱ्याच्या वेताळाने त्या प्रेतात प्रवेश केला आणि त्या प्रेताच्या तोंडाने तो बोलू लागला, ‘अरे, आपल्या ध्येयावर अविचल निष्ठा ठेवून चालणाऱ्या रामस्यांनो, तुमच्या संयुक्त कामगिरीतून निघालेल्या ‘एक नन्ही-मुन्ही लडकी थी’, ‘दो गज जमीन के नीचे’, ‘दरवाजा’ आणि ‘और कौन’ या चित्रपटांना प्रेक्षकांनी धडाधड भडाग्नी दिले; तरीही तुमचा हट्ट अजून संपलेला दिसत नाही! मला तुमच्या कृतनिश्चयाचे अतिशय कौतुक वाटते. तुमची वाटचाल कंटाळलेली होऊ नये, म्हणून या कुमारने जिच्यावर पटकथा बेतली अशी जे. के. अहुजांनी लिहिलेली, तुलसी आणि श्याम, तुम्हीच दिग्दर्शित केलेली आणि गंगू, केशू तुमच्या कॅमेऱ्याने टिपलेली तुमच्याच ‘सबूत’ चित्रपटाची कथा सांगून मी तुमचे मनोरंजन करतो.

आटपाट नगरामध्ये सेठ धर्मदास नामक एक लक्ष्मीपुत्र राहत होता. त्याला आशा व काजल नामक दोन तरुण सुस्वरूप कन्या होत्या. आशाचा पती विकास याला विमानाच्या अपघातात मृत्यू पावल्याने बिचारीला वैधव्य आले होते. धर्मदासच्या एका कापडगिरणीवर कब्जा करण्यासाठी धनराज, मनमोहन सक्सेना, गुप्ता आणि रीटा या चौघांनी त्याचा रेल्वेत खून केला आणि त्याला गाडून टाकले; पण गाडताना धर्मदासच्या डोळ्यांची उघडझाप झाली.

पुढे सक्सेना, रीटा आणि गुप्ता मृत धर्मदासच्यासारखी आकृती दिसल्याने त्या धक्क्याने मरण पावले. धनराजलाही ती आकृती दिसली आणि त्याला गोळी लागल्याने तोही मेला! दरम्यानच्या काळात इन्स्पेक्टर आनंदने ती आकृती म्हणजे वेशांतर केलेली आशा असल्याचे उघडकीस आणले. धनराजवर अजित रॉय या उपऱ्याने गोळी झाडल्याचे सिद्ध करून कोणत्याच मृत्यूस आशा प्रत्यक्ष जबाबदार नसल्याचे दाखवून देऊन तिला निर्दोष ठरवून टाकले. विकासही जिवंत असल्याचे सांगून आशा-विकास-मीलन घडवले आणि स्वत: काजलशी जमवून टाकले.

आता या कथेबाबत आणि तुमच्या चित्रपटाबावत मला असलेल्या काही शंका मी तुम्हाला विचारतो.

रहस्यपट असे म्हटल्यानंतरही नाचगाणी, फुटकळ विनोद, हिजड्यांचा सहभाग, पोलिसांचा बावळटपणा, योगायोग, विद्रूप चेहरा, भलत्याच व्यक्तींबद्दल संशय इत्यादी इत्यादी फापटपसारा या गोष्टी शंकांच्या पलीकडे गेलेल्या आहेत. त्यामुळे त्याबद्दल मी तुम्हाला काही विचारणार नाही. माझी पहिली शंका आहे ती मेलेला धर्मदासच्या उघडझाप करणाऱ्या डोळ्यांबद्दल. मेल्यानंतर दोन वेळा धर्मदास चांगला डोळे मिचकवल्यागत ही उघडझाप करतो. त्यातून तुम्हाला काय सुचवायचे होते? का आपला द्यायचा प्रेक्षकाच्या डोक्यात एक किडा सोडून?

तुमच्या बाकी पात्रनिवडीबद्दल मला काही म्हणायचं नाही. अगदी नवीन, निश्चल व काजल किरणचा ठोकळेबाजपणा आणि ओम् शिवपुरीचा ओव्हरस्टायलिशपणाही मी सहन करू शकेन; पण प्रेम चोप्रा या गृहस्थाच्या काही बावळट आणि मूर्ख चाळ्यांना आवर घालण्यात आपण अपयशी कसे काय ठरलात? की तुमच्याच प्रोत्साहनाने वा सल्ल्याने या आचरट हरकती चालल्या होत्या?

पण जाऊ दे, या अशा किरकोळ शंका बाजूला लोटून माझ्या मनात बरेच दिवस खदखदत असलेली शंका मी आता विचारतो.

एक चार–पाच खुनांची साखळी, एक विद्रूप चेहरा, काही किंकाळ्या हे सगळे एकत्र मिसळून एक रहस्यपट वा भीतिपट तयार होतो असा तुमचा गोड गैरसमज होता. आतापर्यंतच्या तुमच्या सर्व चित्रपटांना लाभलेल्या उदंड अपयशामुळे खरे तर हा गैरसमज नुसता कोसळूनच नाही तर साफ धुऊन जायला पाहिजे होता; पण तसे काहीही न होता जणू अधिकच उत्साहाने उसळल्याप्रमाणे तुमची ही चित्रपटनिर्मिती चालूच आहे. तुम्हाला हे कसे शक्य होते? चित्रपटव्यवसायाशिवाय पोट जाळण्यासाठी तुम्हाला इतर उद्योग नाहीत का–उदाहरणार्थ-भंगाराचा व्यापार? पैसा कमवा; पण मग त्यासाठी प्रेक्षकांवर अत्याचार कशाला? शिवाय माझ्या चेहऱ्याचा काल्पनिक किंवा काही तरी आयडियाबाज भूत म्हणून वापर करून मला या पापात कशाला ओढता?

मला ठाऊक आहे–या शंकांची समाधानकारक उत्तरं जर तुम्ही दिलीत; तर माझ्याच डोक्याची शंभर शकलं होऊन ती तुमच्या पायांशी लोळू लागतील. म्हणूनच माझं डोकं अजूनही शाबूत आहे; पण माझा नाही तरी प्रेक्षकाच्या सहनशक्तीचा तरी तुम्ही काही तरी विचार करा!’

वेताळाचे एवढे बोलणे होते न होते तोच संतप्त प्रेक्षकांचा आरडाओरडा त्याच्या कानी आला आणि रामसेंच्या या चित्रपटाचे भवितव्य ओळखून आणि प्रेत तेथेच टाकून वेताळ पुन्हा झाडावर जाऊन लोंबकळू लागला. □